CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड



www.surajyadigital.com | मंगळवार, दि.१४ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १३७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# ‘जनवात्सल्य’च्या साक्षीने ‘लोटस’मध्ये ‘ऑपरेशन’

## -काँग्रेस-राष्ट्रवादीचा हातात ‘हात’

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर लोकसभेच्या जागा देण्या-घेण्यावरून काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधील पेटलेल्या वादाचा वणावा अखेर दोन्ही पक्षातील नेते मंडळींनी एकत्र घेऊन मिटवला. हातात हात घालत ‘मिले सूर हमारा तुम्हारा’चा नारा देत वाद मिटल्याचे जाहीर केले. आगामी निवडणुकीत भाजपच्या विरोधात एकत्र येऊन लढण्याचा निर्धार केला. माजी केंद्रीयमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या जनवात्सल्य निवासस्थानी झालेल्या ‘चाय पे चर्चे’ने दोन दिवसातील वादाचा कडवटपणा जाऊन गोडवा निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.**



शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष भारत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी यांनी हॉटेल लोटस येथे एकत्रित बैठक घेऊन सकारात्मक चर्चा केली. यापुढे कोणताही वाद न वाढवता दोन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी हातात हात घालून महाविकास आघाडीच्या वतीने भाजपच्या चुकीच्या धोरणाविरुद्ध लढण्याचा निर्धार व्यक्त केला.

आ. रोहित पवार हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी सोलापूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडण्याची मागणी होऊ शकते, असे विधान केले होते. त्यावरून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी थेट बारामती मतदारसंघ काँग्रेसला सोडण्याची उलट मागणी केली होती. यावरून दोन्ही काँग्रेसमध्ये वादावादी सुरू झालेली होती. या वादात काँग्रेसमधून शिवसेना मार्गे राष्ट्रवादीकडे वाटचाल करणारे माजी महापौर महेश कोठे यांनी उडी घेतली. त्यांनी काँग्रेस शहराध्यक्ष नरोटे यांची बारामती मतदारसंघाची मागणी शिंदे कुटुंबीयांना अडचणीची ठरणारी आहे, असे वक्तव्य केल्यानंतर काही वेळात आ. प्रणितीताई शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना ‘कोण रोहित पवार?’ असा प्रश्न उपस्थित केला आणि वाद भडकला. त्यानंतर दोन्ही काँग्रेसचे पदाधिकारी तोंडसुख घेत एकमेकाविरोधात भिडले होते. युवा पदाधिकाऱ्यांनी ज्या त्या पक्षाच्या कार्यालयाजवळ पोस्टरबाजी करत घोषणाबाजी केली होती.

या बैठकीस काँग्रेसचे कार्याध्यक्ष संजय हेमगड्डी, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, नगरसेवक आरिफ शेख, प्रवीण निकाळजे, विनोद भोसले, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, माजी युवक अध्यक्ष अंबादास बाबा करगुळे, राष्ट्रवादीचे नेते मंडळी शंकर पाटील, शफी इनामदार, जनार्दन कारमपुरी, तौफिक शेख, प्रमोद गायकवाड, जुबेर बागवान, अँड केशव इंगळे, शकील मौलवी, तिरुपती परकीपंडला, सुशील बंदपट्टे, श्रीकांत वाडेकर, शरद गुमटे, सुनील सारंगी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भाजपविरूध्द युध्द आमचे सुरू

याचे पडसाद मोठ्या प्रमाणात पडण्याची शक्यता लक्षात येताच काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेच्या वरिष्ठ नेतेमंडळींनी वाद मिटवण्याचे आवाहन केले. शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष भारत जाधव यांच्या अध्यक्षेतेखाली काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी यांनी हॉटेल लोटस येथे एकत्रित बैठक घेऊन सकारात्मक चर्चा केली. यापुढे कोणताही वाद न वाढविता दोन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी हातात हात घालुन महाविकास आघाडीच्या वतीने भाजपच्या चुकीच्या धोरणाविरुद्ध लढण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

### चालक-मालक शिंदे...

‘लोटस’मधील बैठकीला उपस्थित असलेले राष्ट्रवादीचे बरेच नेते हे पूर्वीचे काँग्रेसवालेच आहेत. निवडणूकीची जबाबदारी असणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांना का बोलावले नाही? बैठकीनंतर सर्वजण जनवात्सल्यवर गेल्याने शिंदे हेच शहरात दोन्ही पक्ष चालवत आहेत; हे दाखवून द्यायचे तर नाही ना? असा खोचक सवाल राष्ट्रवादीच्या एका नेत्याकडून उपस्थित केला जात आहे.

### उलटसुलट चर्चा

राष्ट्रवादीचे शंकर पाटील, शफी इनामदार, जनार्दन कारमपुरी, तौफीक शेख, प्रमोद गायकवाड यांचा मंडळीचा सहभाग होता. महेश कोठे, सुधिर खरटमल, मनोहर सपाटे, महेश गादेकर, नगरसेवक, युवक पदाधिकारी गैरहजर होते. त्यांना जाणिवपुर्वक निरोप दिला नाही अशी एक उलटसुलट चर्चा बैठकीतील राष्ट्रवादीच्या उपस्थितीवरुन केली जात आहे.

## महापालिकेचे २० फेब्रुवारी रोजी अंदाजपत्रक

### महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर महापालिकेचे यंदाचे अंदाजपत्रक येत्या २० फेब्रुवारी रोजी सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली. सोलापूर महापालिकेच्या अंदाजपत्रकाच्या तयारीची लगबग गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. सर्व विभागाकडून यापूर्वीच महापालिका आयुक्तांनी आढावा घेतला आहे.

यंदाच्या प्रशासकीय राजवटीतील हे पहिलेच अंदाजपत्रक राहणार आहे. महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक शीतल तेली- उगले या हे अंदाजपत्रक २० फेब्रुवारी रोजी सादर करणार आहेत. वास्तववादी अंदाजपत्रक राहणार असल्याचे संकेत यापूर्वीच आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले आहेत. कोणतीही वाढ करण्यापेक्षा थकबाकी वसुलीला प्राधान्य राहील असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

यंदाच्या या पहिल्याच प्रशासकीय अंदाजपत्रकामुळे शहरवासीयांचे याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, मागील वर्षाचे सोलापूर महापालिकेचे अंदाजपत्रक सुमारे १०५५ कोटी रुपयाचे होते. यंदाचे अंदाजपत्रक नेमके किती रुपयाचे राहणार? यामध्ये काय काय तरतुदी असतील याची उत्सुकता लागली आहे.

## ४५ वर्षीय इसमाची गळफासाने आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका ४५ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना ऊळे (ता.दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. केराप्पा महादेव गायकवाड (वय ४५ रा. ऊळे) असे मयताचे नाव आहे. दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून सिद्धार्थ गायकवाड (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही.

## चुलीच्या आगीतून झोपडी पेटली, वृद्ध दाम्पत्याचा होरपळून मृत्यू

✔ **बार्शी** : चुलीवर पाणी तापवताना चुलीतील ज्वालातून झोपडीला लागलेल्या आगीत वृद्ध दांपत्याचा तसेच झोपडीत बांधलेल्या तीन शेळयांचा जळून जागीच मृत्यू झाला. बार्शी तालुक्यातील गाडेगांव येथील पवार वस्तीवर सोमवारी पहाटे साडेतीन ते चारच्या सुमारास ही घटना घडली. भीमराव काशीराम पवार वय ९५, कमल भीमराव पवार वय ९० रा गाडेगांव ता. बार्शी असे यातील मयत वृद्ध दांपत्याचे नांव आहे. त्यांचा नातू प्रथमेश किशोर मोहिते वय १३ हा या घटनेतून बालंबाल बचावला आहे. या दुर्देवी घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.



भीमराव पवार व कमल पवार या दांपत्यांना ९ विवाहित मुली असून यातील दोन मुली व काही नातू गावात राहतात. पवार यांचे गावात कच्चे घर आहे. काही कारणामुळे ते गावापासून साधारणत: अर्धा किलोमीटरवर असलेल्या शेतात झोपडीत राहत होते. मदतीसाठी प्रथमेश किशोर मोहिते हा नातूही त्यांच्यासोबत वस्तीवर राहत असे. प्रथमेश हा बार्शीतील मॉडेल हायस्कूल येथे इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेत आहे. वस्तीवरूनच तो बार्शीला ये-जा करत आहे. शेतातच पवार दांपत्य दोन शेळया, पिल्ले व एक रेडीही सांभाळत होते. गावात राहणारी एक लेक तिघांसाठी डबा बनवून द्यायची. त्यामुळे झोपडीत स्वयंपाक बनवायची वेळ येत नसे. झोपडीतील चुलीवर चहा बनवायचे. सोमवारी पहाटे लघुशंकेसाठी उठल्यानंतर त्यांना बाहेर बांधलेली रेडी सुटलेली दिसली म्हणून त्यांनी नातू प्रथमेशला उठवून ती आणण्यास सांगितले. व झोपडीतील चुलीवर पाणी तापण्यास ठेवले. प्रथमेश रेडी आणेपर्यंत इकडे चुलीतील ज्वाळा कुडाच्या पाचटवजा झोपडीला आग लागली. त्यात वृद्ध दांपत्यासह दोन शेळया, एक कोकरू मृत पावले. एक कोकरू बचावले आहे. दरम्यान, भल्या पहाटेच घडलेल्या या घटनेने गावावर शोककळा पसरली.

आ.राजेंद्र राऊत, तहसीलदार सुनील शेरखाने, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी, मंडलअधिकारी, तलाठी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत

झोपडी पूर्ण जळाल्यानंतर भीमराव व कमल यांचे मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत होते. पंचनामा करून तेथेच शव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. घटनेची माहिती कळल्यानंतर आलेल्या मुलींना अश्रू अनावर झाले होते. शेतातील वस्तीवरच दोघांना एका चितेवर झोपवून सायंकाळच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मित्राच्या प्रियसीला घरी बोलावून तिच्यावर केला बलात्कार

### अश्लील फोटो काढून धमकी

✔ सुराज्य/मोहोळ

प्रियकर घरी येणार असल्याचे सांगून मित्राच्या प्रेयसीला घरी बोलावून तिच्यावर बलात्कार करून तीचे अश्लिल फोटो काढून धमकी दिल्याची घटना मोहोळ येथे घडली.

याबाबत एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पिडीत महिला एके दुकानात नोकरी करीत होती त्याच ठिकाणी विजय सुतार व त्याचा मित्र काम करीत होते. विजय सुतार याच्या मित्रासोबत पिडितेचे प्रेम संबंध जुळले होते त्यानंतर काही कालावधी नंतर विजय सुतार याच्या मित्राने काम सोडले परंतु त्यांचा फोन एकमेकांना होत होता तो पिडीत महिलेस तिचा प्रियकर घरी येणार असून तुला त्याने बोलवले असल्याचे सांगितले त्यामुळे ती पिडिता विजय सुतार हा मित्र असल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्या घरी गेली असता विजय च्या घरी कोणीही नव्हते पिडिता आत येताच विजयाने दरवाजाला आतून कडी लावून घेतली व तो तिचा प्रियकर असलेला मित्र येणार नाही मला तुझ्याबरोबर संबंध ठेवायचे आहेत मी तुला खोटे बोलून इथे घेऊन




आलो असल्याचे त्याने सांगितले यावेळी दरवाजा उघड मला घरी जायचे आहे असे सांगूनही त्याने दरवाजा उघडला नाही त्याने जबरदस्ती केली व तुला इथेच खलास करून टाकीन अशी धमकी दिली त्यानंतर त्याने तीचे मोबाइलवर अश्लिल फोटो काढले इज्जतीच्या व जिवाच्या भीतीने तिने ही गोष्ट कोणास सांगितली नाही परंतु विजय हा वारंवार फोटो सर्वांना पाठवीन अशी धमकी देत होता. चार महिन्या पूर्वी परत विजयाने धमकी देऊन शरीर संबंध केले.

पिडितेने घडला प्रकार पतीस सांगितला पतीने पिडितेस धीर दिला व मोहोळ पोलीस ठाण्यात येऊन या घटनेची फिर्याद दाखल केली. त्यानुसार विजय सुतार याचेवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता यांना रिटायरच करा !

कल्याण
279-80-127

मेन बाजार
245-19-379

## सत्तासंघर्षाची सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

### ७ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे प्रकरण वर्ग होईल का?

✔ **मुंबई** : महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची सुनावणी उद्या होणार आहे. बोर्डावर पहिल्या क्रमांकाचे प्रकरण असेल, असेही सर्वोच्च न्यायालयाने गेल्या सुनावणीच्या वेळी स्पष्ट केले आहे. गेल्या महिन्यात १० तारखेला सुनावणी झाली होती. हे प्रकरण ७ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे प्रकरण वर्ग करण्याची मागणी ठाकरे गटाने केली आहे. त्याबाबतही आज सुनावणी होणार आहे.

गेल्या ७ महिन्यांपासून राज्यात सत्तासंघर्ष सुरू आहे. महाराष्ट्रात भाजपाच्या मदतीने एकनाथ शिंदेंनी बंड केले आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर त्यांनी केलेली नव्या सरकारची स्थापना, १६ आमदारांच्या अपात्रतेची याचिका (ठाकरे गटाकडून), विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव (शिंदे गटाकडून) यासह आणखी इतर याचिकांवर सर्वात आधी २१ जुलै रोजी एकत्रित सुनावणी



झाली होती. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सरन्यायाधीश एन. व्ही. रमण, न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी शिवसेनेच्या बाजूने आणि ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी शिंदे गटाच्या बाजूने युक्तिवाद केला. त्यानंतर तारीख पे तारीख मिळत आता ही सुनावणी नव्या वर्षातील १० जानेवारी २०२३ला झाली. सरन्यायाधीश वाय. एस. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठासमोर सुनावणी झाली असता ती १४ फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

निवडणूक आयोगाकडे ३० जानेवारीत झालेल्या शेवटच्या सुनावणीत ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना लेखी युक्तिवाद सादर केला आहे. शिवसेनेने दाखल केलेल्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आधी निर्णय घ्यावा. तोपर्यंत निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हाबाबत निर्णय घेऊ नये, असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

विशेष म्हणजे, येत्या २६ फेब्रुवारी २०२३ रोजी पुण्यातील कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक होत आहे. या दोन्ही ठिकाणी तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. कसबा पेठमध्ये काँग्रेसचे रवींद्र धंगेकर, भाजपचे हेमंत रासने आणि महासंघाचे आनंद दवे यांच्यात लढत होईल. तर, चिंचवडमध्ये महाविकास आघाडीचे नाना काटे, भाजपच्या अश्विनी जगताप आणि ठाकरे गटाचे बंडखोर राहुल कलाटे रिंगणात आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात ही सुनावणी होणार आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर दुष्कर्म

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील एक अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तरुणाने तिच्यावर दुष्कर्म करून नग्न फोटो सोशल मीडियावर अपलोड केल्याची घटना घडली.

याप्रकरणी पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून संजय बेत (रा. सोलापूर) याच्याविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पिडितेची कामाच्या ठिकाणी संजय याच्याबरोबर ओळख झाली होती. त्या ओळखीचे प्रेमांत रूपांतर झाले. त्यानंतर त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून पत्र्याच्या शेडमध्ये मुलीवर दुष्कर्म केले. त्यावेळी त्याने शरीरसंबंधाचे नग्न फोटो त्याच्या मोबाइलमध्ये काढले. त्यानंतर त्याने लग्न करण्यास टाळाटाळ करून तिच्याशी बोलणे बंद केले. त्यानंतर त्याने माझ्याशी असेच परत येते का नाही अन्यथा तुझे नग्न फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची तिला धमकी दिली. त्यावेळी मुलीने फोटो व्हायरल करु नको असे समजावून सांगितले होते.

मुलीने तिच्या मोबाइलवरील सोशल मीडियावर त्याच्या नावाची प्रोफाइल पाहिली असता दोघांचे नग्न फोटो होते. मुलीच्या चेहऱ्यावर स्टिकर लावून त्याच्या प्रोफाईलवर फोटो अपलोड केलेले दिसले. त्यानंतर मुलीने पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

CMYK

## द्राक्षाचा सुगंध...

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाने द्राक्षाचे नवीन वाण विकसित केले आहे. ही सुवार्ता तशी राज्याच्या कृषी क्षेत्राची मान उंचावणारी आहे. पुण्यातील मांजरीच्या फार्म प्रयोगशाळेत हे नवे द्राक्ष वाण विकसित करण्यात आले. विकसीत करण्यात आलेले नवीन वाण हे सुगंधी लाल रंगाचे आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून या वाणाच्या संशोधनाचे काम सुरू होते. त्याला अखेर यश आले. चालू हंगामात हा द्राक्ष वाणाचा प्लॉट काढणीला आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन उत्कृष्ट रंग, उत्कृष्ट चव, वजन आणि सुवासिक द्राक्ष प्रजाती विकसित करण्यात द्राक्ष बागाईतदार संघास यश आले आहे. त्याबद्दल संघाचे आम्ही सर्वप्रथम अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या विविध भागात, वेगवेगळ्या भौगोलिक आणि वातावरण परिस्थितीत या वाणाची चाचणी व्हावी, या उद्देशाने मांजरी फार्म येथील प्रयोगशाळेसोबतच बागाईतदार संघाच्या काही प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रयोगासाठी सदर वाणाची काही रोपे देण्यात आली होती. सर्व प्लॉट्सवर या वाणाबाबत समाधानकारक अभिप्राय प्राप्त झाले. या चाचणी दरम्यान प्राप्त झालेल्या अभिप्राय आणि सूचनांचा अभ्यास करून या वाणात अजून काही सुधारणांची शक्यता तपासली जाणार आहे. कारण ही एवढीच प्रगती समजता कामा नये. प्रगती कशी थांबत नसते. पुढचे पाऊल खुणावत असते. संघाच्या या निर्धारात तीच इच्छाशक्ती दिसते. देशात द्राक्ष निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा एकछत्री अंमल असून आकर्षक रंग आणि मधुर चवीच्या द्राक्षांना युरोप, चीन, मध्य-पूर्व आशियासह जगभरात मोठी मागणी असते. सुधारित वाणांच्या वापराने निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनात भरघोस वाढ होईल असा विश्वास महाराष्ट्र द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष शिवाजीराव पवार यांनी व्यक्त केला. संघ सातत्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हितासाठी नवनवीन संशोधनांना पाठबळ देत आहे. तसेच अधिकाधिक सक्षम, निरोगी आणि उत्पादनक्षम द्राक्ष वाणांच्या विकासासाठी



जागरूकपणे कार्य करत आहे. प्रेरणा व पाठबळ असल्याखेरीज प्रगतीचा मार्ग दिसत नाही. संघाची ही भूमिका अभिमानास्पद आहे. नव्याने विकसित करण्यात आलेले वाण हे सध्याच्या क्रिमसन जातीपेक्षाही सुधारित आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय तसेच स्थानिक बाजारपेठेत देखील याला चांगला दर मिळणार आहे. तसे पाहता द्राक्ष हे नाशवंत फळ. काढणींनंतर पाच ते सहा दिवस ती चांगली राहतात. हैद्राबादमध्ये तयार होणारी द्राक्षे फक्त हैद्राबादमध्येच विकली जायची. परंतु महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी-यांनी पंचवीस वर्षांपूर्वी कोरॉगेटेड बोर्डच्या बॉक्समध्ये द्राक्षे पॅक करण्याची पध्दत तयार केली व काढणींनंतर फक्त दोन ते तीन दिवसांत द्राक्षे मुंबई, दिल्ली, कलकता, चेन्नई सारख्या दूरवरच्या बाजारांत पोहोचविण्याची यंत्रणा उभी केली. तासगाव, नाशिकची द्राक्षे भारतभर प्रसिध्द झाली व त्यांना चांगला भाव मिळू लागला हे याचमुळे. सन १९५० मध्ये काही द्राक्ष बागायतदारांच्या लक्षात आले की, युरोपमध्ये वेगवेगळ्या देशांतून संपूर्ण वर्षभर द्राक्षे येतात व त्यांना चांगली किंमत मिळते. परंतु एप्रिल व मे महिन्यामध्ये जगामध्ये कुठेही द्राक्षे मिळत नसल्यामुळे या महिन्यामध्ये युरोपमध्ये द्राक्षांना विशेष मागणी असते. भारतामध्ये या वेळी द्राक्षे उपलब्ध असतात. एप्रिल-मे महिन्यात भारतीय द्राक्षे युरोपमध्ये पाठविल्यास त्यांना चांगली किंमत मिळेल. एका शेतकऱ्यांनी उत्तम दर्जाची द्राक्षे कोरोगेटेड बोर्डच्या बॉक्समध्येच पॅक केली व दोन-तीन टन द्राक्षे विमानातून स्वतः बरोबर लंडनला मे महिन्यामध्ये तो घेऊन गेला. तेथील बाजारपेठेत त्यांची भारतीय द्राक्षे म्हणून विक्री केली.त्या विक्रीतून येण्या-जाण्याचा खर्च निघाला परंतु, शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीसाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाची मोलाची माहिती मिळविली. परत येऊन या माहितीची चर्चा तत्कालीन मुख्यमंत्र्यासोबत केली. द्राक्षे काढणींनंतर चार तासात विशिष्ट प्रकारच्या बॉक्समध्ये पॅक करून त्याचे प्री-कूलिंग' करून शून्य अंश सें. ग्रे. तापमानात ठेवणे व या तापमानामध्ये त्यांना रेफर कंटेनरमध्ये घालून युरोपपर्यंत पोहोचविल्यास आपली द्राक्षे पन्नास दिवसांपेक्षा जास्त दिवस ताजी राहू शकतील व युरोपमध्ये समुद्रमार्गे किफायती खर्चामध्ये पाठवून शेतकरी बऱ्यापैकी नफा मिळवू शकतील अशी ती संकल्पना होती. याच संकल्पनेमुळेच पुढे अमूलच्या धर्तीवर द्राक्ष निर्यातीसाठी महाग्रेपची स्थापना झाली. राज्य शासनाने महाराष्ट्रात अद्ययावत अशी सतरा इंटिग्रेटेड कोल्ड स्टोअरेज उभी केली आहेत. प्रत्येक कोल्ड स्टोरेजबरोबर त्या विभागातील द्राक्ष उत्पादक संघटित होते व सर्व द्राक्ष उत्पादन महाग्रेप या एका ब्रँड नावाने देशाबाहेर निर्यात होऊ लागले. अशा प्रकारचे इन्फास्ट्रक्चर त्या काळातच काय आजसुद्धा एवढ्या मोठ्या प्रमाणात महाराष्ट्राच्या बाहेर भारतात कुठेही नाही. आज महाराष्ट्रात अद्ययावत अशी बरीच कोल्ड स्टोरेज खाजगी किंवा कॉर्पोरेट मालकीची आहेत व त्यातून द्राक्षे व इतर फळे निर्यात होतात. कृषी क्षेत्रात असे नवे नवे प्रयोग व्हायला हवेत. तरच आजच्या पिढीला शेतीचे महत्त्व कळेल. शेती रोजगार देणारा व्यवसाय आहे.

---

व्हॅलेंटाईन डे

## ...तुमचं आमचं सेम असतं

प्रेम ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी देणगी आहे आणि आयुष्यात खरं प्रेम एकदाच होतं. ईश्वराच्या मनात असते त्यावेळी अचानक त्याला 'ती' आवडू लागते आणि तिलाही 'तो' आवडू लागतो. आनंदाला पारावार राहत नाही. दुनियादारी, भानगडी तेल लावत जातात. आपण एकटेच स्वत:शीच हसतो. जगातले सर्व काही मिळाल्याची भावना तयार होते. एकमेकांशिवाय अजिबात करमत नाही. एकमेकांची खूप खूप काळजी घ्यावीशी वाटते. हृदयामध्ये धडधड जोरात चालू होते. एक दिवस बोलणे झाले नाही तरी चुटचुट लागून राहते. दोघेही जेवल्याशिवाय घास जात नाही आणि दोघेही भेटल्याशिवाय आस जात नाही. तिचा हात हातात घेतल्याशिवाय राहवत नाही. तिचा चेहरा बघितल्याशिवाय चैन पडत नाही. झोप उडते. तिचा चेहरा चंद्रच जणू भासतो. तिच्या सौंदर्याचे वर्णन करताना आपण कवी नसताना सुद्धा आपल्यातला कवी जागा होतो. मग त्या कवितेतून कधी ती चंद्र बनून येते, कधी ती चांदण्या बनून येते, कधी चंद्रावरचा डाग तिच्या गालावरचा तिळ बनून येतो. कधी ती लाल गुलाबच फुल बनून येते. कधी-कधी तर हद्दच होते आणि चक्क ती स्वप्नात येते. कोणाला ती जिलेबीसारखी गोड दिसायची म्हणून कोणी तिला 'जिलेबी' म्हणायचं. कोणाला ती गुलाबजाम इतकी गोड हसायची म्हणून कोणी तिला 'गुलाबजाम' म्हणायचं. कधी अचानक ती बासुंदी भासते. कधी ती वडापावसारखी तिखट पण असते. ती जेवली तरच आपण जेवायचं. ती नाही जेवली तर आपण पण नाही जेवायचं, मग तिने लटक्या रागाने म्हणायचं की 'तु जेवणार आहेस की नाहीये' आणि मगच आपण जेवायचं. कारण तिला त्याचा आणि त्याला तिचा ध्यास लागलेला असतो. कधी कधी तिच्या घरी जी भाजी असते ती आपल्या ही घरी होते.. मग 'सेम-सेम' होतं. कधी कधी तिने मेथीची भाजी बनवली की आपली पण मेथीच असते. तिने गवार बनवली की आपली पण गवारच असते.. मग पुन्हा 'सेम - सेम' होतं. त्याच्या पण पुढं जाऊन काय होतं माहिती आहे? त्याच्या पुढे जाऊन आपल्याला तिच्या हातची भाजी भाकरी लई आवडते. आपण म्हणतो मला तुझ्या हातची भाजी खायची पण ती संधी आपल्याला मिळत नाही. कधी मग सुरू होतं चोरुन-चोरुन भेटणं. तिला भेटायला आपण तब्बल दोन तास अगोदरच येऊन थांबायचं. 'ती' भेटल्यावर आताच आलोय असं सांगायचं. कधी-कधी तिनेही आपल्यासाठी एक तास आधी यायचं आणि भेटल्यावर आताच आलेय अस सांगायचं. बसस्थानकात अशा शेकडो बस तिच्यासाठी सोडायच्या पण तिला नाही सोडायचं. कधी भेट नाही झाली किंवा बोलणं नाही झालं तर उगाचच चुटचुट लागून राहते. अश्रू अलगद बाहेर येतात. ज्या हाताचा उलटा पंजा डोळ्याला लावायची कधीच आवश्यकता पडली नाही, त्या दिवशी मात्र हाताच्या उलट्या पंजाने अश्रू दूर सारायची गरज खूप भासते.



असं म्हटलं जातं की जुने ऋणानुबंध असल्याशिवाय कोणी कोणाच्या आयुष्यात येत नाही म्हणूनच ती आपल्या आयुष्यात आलेली असते. तिच्यासाठी आपण एकादशीचा उपवास धरायचा. मग तिने म्हणायचं माझ्यासाठी उपवास नको धरत जाऊस. आपण मात्र शेकडो वर्षे उपवासाच व्रत पाळायचं. प्रेम इतकं नितांत असतं की तिने आठवण काढल्यानंतर आपल्याला उचकी लागतेच आणि आपण आठवण काढल्यानंतर तिला उचकी लागतेच. कधी कधी ठसका पण लागतो. मग नंतर आपण तिला विचारायचं की 'तु माझी आठवण काढली होतीस का?' तिने आश्चर्याने विचारायचं की, 'तुला कसं माहिती?' आपण म्हणायचं, 'उचकी लागली होती ना'. असं हे प्रेम असतं.

मंगेश पाडगावकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'तुमचं आमचं सेम सेम असतं'. ज्यांना आयुष्यात असं झालं, त्यांनाच आयुष्यात खरं प्रेम झालेलं असतं. प्रेमाला जात, पात, धर्म, प्रांत, विवाहित, अविवाहित अशा मर्यादा नसतात. अगदी सीमारेषा अर्थात 'लाईन ऑफ कंट्रोल' नसतात. म्हणूनच की काय प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या पलिकडे अर्थात भारतीय लोकांचे पाकिस्तान, बांगलादेशात पण प्रेम झाल्याची जिवंत उदाहरणे आपण पाहिलेली आहेत. कारण प्रेम ही एक निसर्गाने मानवाला दिलेली अनमोल अशी भेट आहे. ती एक पवित्र भावना आहे. प्रेम आयुष्यात एकदातरी करुन बघावं. कोणावर तरी एकदा मरुन बघावं. कोणासाठी तरी आज लवकर निघावं. प्रेम आयुष्यात एकदा तरी करून बघावं. खरं प्रेम आयुष्यात फक्त आणि फक्त एकदाच होतं. म्हणून आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उगाच आलेली नसतात. तयार होणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे आणि नात्यामागं काहीतरी कारण असत. नाहीतर करोडोंची आबादी असणाऱ्या देशात याच व्यक्तीशी आपली ओळख का होते? कोण घडवून आणतं हे? याचा मास्टर माईंड अर्थात सूत्रधार कोण? याचे उत्तर या जगात कोणीही देऊ शकत नाही.

पण प्रेमाची दुसरी बाजू आपण बघत नाही. या जगात प्रत्येक जण खरं प्रेम करत नसतो. प्रेम करणारे खूप असतात पण ते निभावणारे फारच थोडे मुलं आणि मुली आढळून येतात. प्रेमाच्या प्रांतात 'सोडून जाणे' हा विषयच नसतो. कारण जी व्यक्ती तुमच्यावर खरं प्रेम करते ती कधीच आपल्या आवडत्या व्यक्तीला दुःखाच्या सागरात सोडून जात नाही. जी व्यक्ती सोडून जाते तिने आपल्यावर खरं प्रेम केलेलं नसतं. ते एक नाटक असतं. ज्यात आपण फसले जातो आणि पर्यायाने बरबाद होतो. जिचं आपल्यावर खरं प्रेम असतं ती व्यक्ती कितीही संकटे आली तरी धरलेला हात कधीच सोडत नाही. जी व्यक्ती धरलेला हात सोडते ती धोकेबाज असते. अशावेळी खूप असह्य मनस्ताप, दुःख, यातना होतात. शेकडो सूर्य उगवले आणि मावळले तरी आठवणींचा एकच सूर्य आपल्या आयुष्यातून मावळायचे नाव घेत नाही. एखादीनं एखाद्यावर खूप प्रेम करावं. निदान तसं नाटक करावं. मग त्याला स्वप्न दाखवावीत. त्यानं तिच्यासाठी सर्व काही सोडायला तयार राहावं. तिनं भेटावं. त्यानही भेटावं. त्यानं तिची वाट पाहावी. त्यानं तिच्यासाठी तासभर आधीच यावं अन् म्हणावं आताच आलोय. रात्रं-दिवस तिच्या आठवणीत जगावं. तिनं मात्र मन भरल्यानंतर त्याला दूर ढकलावं. त्याच्यावर नाही ते आरोप करावेत. त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करावं, त्याला गुन्हेगार ठरवावं, कुटुंबीयापुढे त्याची मानहानी करावी, त्याच्या ज्या नजरेनं प्रेम दिलं, त्या नजरेला खाली पाहायला लावावं. त्याची मात्र तिच्या आठवणीशिवाय दिवस आणि रात्र न व्हावी आणि तिने मात्र विसरून जावं यापेक्षा मोठा घात या जगात दुसरा कोणताही नसतो. कारण ती आनंदी राहते आणि तो जळत राहतो. एवढं पाप करुनही तो तिचं सुखच मागतो. न केलेल्या चुकांचे खापर आपल्यावर फोडते. आपली मानहानी करते. आपली बदनामी करते. आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करते. यापेक्षा मोठे दुःख दुसरे असू शकत नाही. म्हणून तरुण-तरुणींनी प्रेम आंधळं असले तरी ते डोळसपणे करावं. कोणावर इतका विश्वास ठेवू नये की आपल्या मनात आत्महत्याच्या विचारांनी घर करावं. कोणामध्ये इतकं गुंतू नये की आपल्याला त्यातून बाहेर यायचाच विसर पडावा. कोणावर इतके प्रेम करू नये की त्यानं आपल्या भावनांशी खेळून निघून जावं. ती सोडून जाणारी व्यक्ती तिकडे खुश असते आणि आपण इकडे आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतो. त्यामुळे तरुण-तरुणींनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की प्रेम करणारे खूप आहेत पण निभावणारे खूप कमी असतात. जो आपल्या प्रेमाला सोडून जातो तो आयुष्यभर पश्चाताप करत राहतो. जाता जाता एकच...जी जीवाच्या पलिकडची नाती तयार होतात. ती जीवाच्या पलिकडे जपावीत.

**- दत्ता पवार.**

(लेखक हे पत्रकार आणि स्तंभलेखक आहेत)

---

टुडेज् ब्लॉग

## समाजव्यवस्था मोडकळीस आणणारा दिवस

**प्रतिवर्षी १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे का साजरा केला जातो? या दिवसाचा इतिहास काय आहे? असे अनेक प्रश्न आपल्या मनात निर्माण होतात. दुर्दैवाने याविषयीच्या कोणत्याही प्रश्नाचे योग्य उत्तर कुठेही उपलब्ध नाही. विविध संकेतस्थळांवर व्हॅलेंटाईन डेचा इतिहास मिस्ट्री म्हणून संबोधला गेला आहे. युरोपमध्ये अजूनही संदिग्धता आहे की, नक्की कोणत्या व्हॅलेन्टाईन नावाच्या व्यक्तिपासून याला सुरुवात झाली. अर्थातच, जसे १ जानेवारी या दिवसाला काहीही सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक, वैज्ञानिक किंवा आध्यात्मिक कारण नाही, तरीही हा दिवस नवीन वर्ष म्हणून साजरा केला जातो, तसेच व्हॅलेंटाईन डेचेही आहे. या दिवशी राष्ट्रद्रोही व्हॅलेंटाईनला त्याच्या राष्ट्रद्रोही कृत्याविषयी फाशी देण्यात आली होती. तिसऱ्या शतकात रोम येथे व्हॅलेंटाईन नावाचा एक पाद्री (प्रीस्ट) होता. त्या काळातील क्लॉडीयस २ नावाच्या राजाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे त्याने व्हॅलेंटाईनला ठार मारण्याचा आदेश दिला होता. खरे पाहता व्हॅलेंटाईन डे ख्रिस्ती पंथाशी निगडित आहे. हा दिवस साजरा करून आपण एक प्रकारे एका दिवसाचे वैचारिक धर्मांतर करत असतो. १४ फेब्रुवारीला असणाऱ्या व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने 'व्हॅलेंटाईन डे'चे वास्तव काय आहे? समाजव्यवस्था मोडकळीस आणणारा व्हॅलेंटाईन डे खरोखरीच साजरा करावा का? ते या लेखाद्वारे जाणून घेण्याचा प्रयत्न करूयात.**

**युवा पिढीला चुकीच्या मार्गावर नेण्याचे षड्यंत्र** - सध्या अधिकाधिक मुले-मुली व्हॅलेंटाईन डे साजरा करतात. एका सर्वेक्षणानुसार सुमारे ३० टक्क्यांहून अधिक मुले मुलींशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी हा दिवस साजरा करतात.इंटरनॅशनल बिझिनेस टाइम या इ-दैनिकानुसार व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी सुसाईड हेल्पलाईनला सर्वांत जास्त फोन येतात. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी मनाप्रमाणे प्रेम न मिळाल्याने निर्माण होणारा एकाकीपणा आणि भग्न मानसिकता ही त्यामागची कारणे आहेत.

**व्हॅलेंटाईन डे ऐवजी मातृ-पितृ दिन साजरा करा** - व्हॅलेंटाईन डे साजरा करण्याऐवजी या दिवसाचा अनेक अल्पवयीन मुलींना मातृत्व देणारा दिवस म्हणून धिक्कार करा, असे मत प्रख्यात वृत्तवाहिनी बी.बी.सी. ने व्यक्त केले होते. व्हॅलेंटाईन डे अनेक देशांत साजरा होतो; मात्र, भारतात हा दिवस मातृ-पितृ दिन म्हणून साजरा करण्याची नवीन पद्धत रूढ होत आहे, ती अत्यंत प्रशंसनीय आहे, असे मत या वृत्तवाहिनीने व्यक्त केले होते.




जगात आणि त्यातल्या त्यात अमेरिकेत व्हॅलेंटाईन डेच्या सुमारास न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटांच्या खटल्यांत ४० टक्के वाढ होत असल्याचे एका खाजगी आस्थापनाने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. या काळात विवाहित स्त्री-पुरुषांच्या विवाहबाह्य संबंधात होणाऱ्या घटनांचा परिणाम घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणात होतो, असे दिसून आले आहे. भारतातील नागरिकांची प्रत्येक बाबतीत पाश्चात्त्य देशांचे अंधानुकरण करण्याची वाढती प्रवृत्ती लक्षात घेता, अशी परिस्थिती भारतातही निर्माण होईल हे भारतीयांनी लक्षात घ्यायला हवे. या देशातील भारतीय संस्कृतीची अपरिमित हानी अशा चुकीच्या डे मुळे होत आहे त्यामुळे अशा दिवसांवर बहिष्कार टाकला पाहिजे! जनतेने व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने भारताच्या अर्थव्यवस्थेवर विदेशी आस्थापनांनी टाकलेला हा दरोडा लक्षात घेऊन अशा विकृत दिवसांना कायमचे हद्दपार करायला हवे.

**हिंदू धर्माचे योग्य शिक्षण घेऊन धर्माचरण करुयात**- व्हॅलेंटाईन डे आणि तशा प्रकारचे इतर डे पाश्चात्त्यांनी निर्माण केलेल्या कुप्रथा आहेत. आपण हिंदू धर्माचा अभ्यास करून त्याचे आचरण केल्यास केवळ एकच दिवस नव्हे, तर आपल्याला अनेक जन्म आणि जन्ममृत्यूच्या पलिकडे जाता येते. जे सुख आपल्याला अशा प्रकारचे डे साजरा करून मिळते; त्या सुखाच्याही पुढचा आनंद मिळवून देण्याची क्षमता हिंदू धर्माच्या शिकवणीत आहे; म्हणूनच व्हॅलेंटाईन डे सारखा दिवस साजरा करण्यापेक्षा हिंदू धर्माचे योग्य शिक्षण घेऊन धर्माचरण करायला हवे. आपल्या बरोबर इतरांनाही या विषयी जागृत करणे गरजेचे वाटते.

आपल्या देशातील चांगल्या आणि युवा पिढीला चुकीच्या मार्गावर नेण्याचे हे एक षड्यंत्रच आहे, व्हॅलेंटाईन डेच्या पाश्चात्त्य विकृतीला आळा बसावा आणि भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठी या 'डे' च्या विरोधात युद्धपातळीवरून प्रचार, प्रसार करण्याची आज आवश्यकता आहे. प्रेमाची जादू खरोखरच अनुभवायची असेल तर आपले क्रांतीकारक, परमवीरचक्रधारी सैनिक, अतिरेक्यांना कंठस्नान घालणारे आमचे तरुण पोलीस, कमांडो यांच्याकडून प्रेम कसे करावे, याचे धडे घेतले पाहिजेत. यातूनच 'हॅलेंटाईन डे'ला आपल्या भारतातून कायमचे हद्दपार करण्याची प्रेरणा मिळेल. हीच आजच्या काळाची आवश्यकता आहे.

**- राजन बुणगे.**

हिंदू जनजागृती समिती.

---

जन्म हा अखेरचा

## भावाचारस्थल - २



कर्तृत्वभावना जेंव्हा जागी होते, तेंव्हा मनात अहंकार दाटतो. मद्यपान केल्यावर जसा मनुष्य झिंगतो त्याप्रमाणे अहंकार झाल्यावर देखील झिंगतो. शास्त्राने कर्म करण्याला प्रतिबंध केलेला नाही. फक्त ते करताना 'हे मी केले असा अहंकार टाळा' एवढीच अट घातली. अहंकारशून्य कृती ही लोककल्याणकारीच असते यात शंका नाही. शेवटी या स्थलाचा समारोप करताना ज. रेणुकाचार्य म्हणतात, **आत्मानखिलं वस्तु शिवमानंदचिन्मयम् । एकभावेन सततं संपश्यन्नेव पश्यति ।।१६.७५।।** आत्मसाक्षात्कार कुणाला होतो? जीव, शिव आणि जगत् असे तीन पदार्थ आहेत. हे दिसतात तीन, परंतु, मुळात एकच आहेत. शिवपरब्रह्म जीव आणि जगत् या रुपात अभिव्यक्त झालेले आहे. प्रेरयिता, भोक्ता आणि भोज्य अशी नावे शिव, जीव आणि जगत् या तीन पदार्थांना 'श्रीसिद्धांतशिखामणी' त दिलेली आहेत. एक शिवपरब्रह्मच या तीन रुपांनी नटले आहे. एकच तीन होतात. 'मी शिव असून प्रपंच शिवमय आहे' शिवशिवाय दुसरे काहीही अस्तित्त्वात नाही, अशा दृढ भावनेने जो तीन तत्त्वांतील एकत्त्व पाहतो तोच खऱ्या अर्थाने शिवाला जाणतो. जीवांच्या रुपाने आणि प्रपंचाच्या रुपाने आपल्यासमोर शिव परब्रह्मच उभे आहे याची जाणीव होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही भावना आपल्याला शिवसाक्षात्कारपर्यंत घेऊन जाते. ज्याला ही भावना करता येत नसेल त्याला शिवसाक्षात्कार होणे शक्य नाही. तुकडोजी महाराजांचे एक प्रसिद्ध भजन आहे, **'मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव, देव अशानं भेटायचा नाही रे । देव बाजारचा भाजीपाला नाही रे।।'**

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## बैठे काम करण्याच्या पद्धतीमुळे पाठदुखी-मानदुखी वाढली

ब्रिटनच्या ऑफिस फॉर नॅशनल स्टॅटिस्टिक्सच्या अहवालानुसार तीन वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ मध्ये आजारपणामुळे काम करू न शकणाऱ्या लोकांची संख्या २० लाख होती ती आता २५ लाखापर्यंत पोहचली आहे. यापैकी सुमारे ६२ हजार लोकांना पाठदुखी व मानदुखीमुळे नोकरी सोडावी लागली आहे. विशेषतः २५ ते ४५ या वयोगटामध्ये पाठ व मानदुखीचे प्रमाण मोठे आहे. ब्रिटनप्रमाणे इतर युरोपियन देशात सुद्धा हीच परिस्थिती असावी ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. लंडनमधील बँक अँड बियाँड क्लिनिकचे संचालक तसेच अर्थोपिडिक सर्जन गेविन बर्ट यांनी सांगितले आहे की, घरी लॅपटॉपवर तासन्तास बसून काम केल्यामुळे हा त्रास सहन करावा लागत आहे.

बर्ट यांच्या मते कार्यालयात काम करण्यासाठी एक खास व्यवस्था असते.त्यामळे आपल्या शरीराला आधार मिळतो. तशी व्यवस्था घरात असत नाही. अनेक जण सोफ्यावर बसतात तसेच बेडवर काम करतात यामुळे अनेकांना त्रास सुरु होतो. मागील दोन ते अडीच वर्षाचा काळ हा जगभरात कोरोनाचा काळ म्हणून ओळखला जातो. घरात सुद्धा कार्यालयासारखी व्यवस्था असावी. सतत बसून राहू नये तर मधून-मधून खुर्चीवरून उठून फेरफटका मारावा मानेचे व्यायाम सुद्धा करावेत, अशी दक्षता घेतल्याने मान दुखी किंवा पाठदुखी होणार नाही.

**- शांताराम वाघ, पुणे.**

---

## हॅपी व्हॅलेंटाईन डे

सांग सखे तुझ्यासाठी,
किती-किती झुरायचं
कॉलेजमध्ये जाताना तू,
मागे-मागे फिरायचं...
वळून तू बघावं म्हणून
मित्रांना आवाज द्यायचं
तुला एकदा पाहण्यासाठी
मी रोज कॉलेजला यायचं...
बरस झालं सखे आता
मागे-मागे फिरायचं
स्वप्नामध्ये रोज पाहून
आतल्या आत झुरायचं
मित्रांनी मला सांगितलं
आता १४ फेब्रुवारी आली
तु तिला बघतोस रोज
ती आमची वहिली झाली
हे ऐकताच माझ्यामध्ये
गझल जागी झाली
तुला बघताच आज सखे
मला प्रेम बाधा झाली
म्हणून आता ठरवलंय
सगळं सांगून टाकायचं
हातामध्ये गुलाब घेऊन
तुझ्यासमोर वाकायचं
चुकून..., गुलाब घेऊन तिला
म्हणालो, 'हैपी रोज डे'
तर, सोलापुरी मित्र म्हणतात,
कसे रोज कुठलं बे ...
म्हण... हॅपी व्हॅलेंटाईन डे !

**- संध्या हेब्बाळकर, सोलापूर.**

---

जन्मदिनानिमित्त

## सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान


आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९० वी जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की, 'मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्याबाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा, अडका, धन, संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी 'बेबी मुमताज' या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबूराव पटेल आणि डॉ. सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबालावर विशेष लोभ होता. त्यांनीच तिला 'मधुबाला' हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे. मात्र उर्दू भाषा येत होती. बॉम्बे टॉकीजचा 'महल' नावाचा चित्रपट आला. हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. 'मुघले आझम' चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली. मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती. त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदयरोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदयरोगासोबत त्यांना असा एक आजार होता की, ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे.



इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. 'मुघले आझम' या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या 'थिएटर आर्टस्' या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी २३ फेब्रुवारी १९६९ साली तिने जगाचा निरोप घेतला. मधुबालाला 'व्हीनस ऑफ स्क्रीन' असे म्हटले जाते मात्र, तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५४ वर्षे झाले मात्र, त्यांच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. 'सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान' असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## विनोद थिटे यांच्यावतीने भारतीय यांचा सन्मान

**वेळापूर** : भारतीय जनता पार्टीचे २०२४ निवडणुकीचे प्रदेश संयोजक आणि भाजपचे प्रदेश महामंत्री आमदार श्रीकांत भारतीय व माळशिरस आमदार रामभाऊ सातपुते हे पंढरपुरला जात असताना भारतीय जनता पार्टी चे २०२४ निवडणुकीचे प्रदेश संयोजक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा माळशिरस भाजपा युवा मोर्चाच्या वतीने सरचिटणीस विनोद थिटे यांनी सन्मान केला. यावेळी भाजप जिल्हा प्रभारी व नूतन जिल्हा नियोजन समिती सदस्य के के पाटील, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, भाजपचे तालुका संघटन सरचिटणीस संजय देशमुख ,अमोल पिंपळे ,आबा पवार ,रणजीत गायकवाड, शिवाजी खुळे व मनोज सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महालक्ष्मी देवीच्या यात्रेत अखंडीत वीजेची मागणी

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील महालक्ष्मी देवीची यात्रा ५ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. यानिमित्त यात्रेत अखंडीत विजपुरवठा करावा अशी मागणी नागरी आघाडीच्या वतीने पिलीव येथील सहहयाक अभियंता थोरात यांच्या कडे निवेदनावरे केली आहे.यात्रेत मोठ्या संख्येने वेगवेगळे व्यावसायिक येतात तसेच पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी .तसेच मंदीरात दर्शनासाठी भाविक मोठया संख्येने येतात. त्यामुळे यात्रा कालावधींत २४ तास अखंडीत विजपुरवठा करण्याची मागणी नागरी आघाडीच्या वतीने करणयात आली आहे.हे निवेदन देताना नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, तसेच राजेंद्र जामदार, मोहन करांडे, कल्याण जावळे, संग्राम पाटील, सचिन भैस उदय जनवर आदी मान्यवर उपस्थितीत होते.

## शेळके प्रशालेचे एन.एम.एम.एस. परीक्षेत यश

**अक्कलकोट** : शासनातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता डिसेंबर २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (छ्चचड) परीक्षेत वागदरी येथील श्री एस. एस शेळके प्रशालेतील इयत्ता आठवी मधील विद्यार्थीनी कुमारी प्रतीक्षा सुभाष नंदे हिने ९२.६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे व सदर शिष्यवृत्तीसाठी ती पात्र ठरली आहे.प्रतीक्षाच्या या यशाबद्दल संस्थेचे जेष्ठ संचालक श्री मल्लिनाथ शेळके सावकार यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी संचालक डॉ शरणकुमार वरनाळे, प्राचार्य अनिल देशमुख, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सदर विद्यार्थीनीस स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख प्रदीप पाटील, शैलशिल्पा जाधव,शिवशरण गवंडी, मल्लिकार्जुन देशमुख,इमामकासीम बागवान,श्रीशैल वाघमोडे, मीनाक्षी माळकुंजे,राजश्री शेळके,राजश्री मुनोळी या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थीनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष श्री बसवराज शेळके सावकार ,प्राचार्य अनील देशमुख, पर्यवेक्षिका शैलशिल्पा जाधव ,सर्व संचालक वर्ग व ग्रामस्थांनी केले.

## पत्रकार वारीशे यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यांवर कारवाई व्हावी

**पिलीव** : कोकणातील राजापूर येथील पत्रकार शशिकांत वारीशे यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पिलीव पत्रकार संघाच्या वतीने माळशिरस पोलीस स्टेशन अंकित,पिलीव औटपोस्ट येथे निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष रघुनाथ देवकर, दामोदर लोखंडे, संजय पाटील, प्रमोद भैस,सुजित सातपुते, अभिजीत तावरे शाहरुख मुलाणी आदी पत्रकार उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे कि गोरगरीब व अन्यायग्रस्त लोकांना आपल्या बेधडक लेखणीतून न्याय मिळवून देणाऱ्या राजापूर येथील दै महानगरी टाइम्सचे पत्रकार शशिकांत वारीशे यांची हत्या करण्यात आली.आंगणेवाडी यात्रेनिमित्त लावण्यात आलेल्या बॅनरवर गंभीर गुन्ह्यातील आरोपींचे फोटो असल्याची बातमी दि ६ फेब्रुवारी रोजी दै महानगरी टाइम्स मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.तो संशयित आरोपी म्हणजेच रिफायनरी प्रस्थापित होऊ शकणाऱ्या भागात जमिनींचे व्यवहार करीत असल्याची माहिती मिळत असून याच संशयित आरोपीने वारीचे यांच्या मोटारसायकल वर आपल्या थार या चार चाकी गाडीने धडक देऊन वारीशे यांची हत्या केल्याचे समोर येत आहे. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई व्हावी अशा आशयाचे निवेदन पिलीव पत्रकारांच्या वतीने देण्यात आले.निवेदन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जरे, पोलीस नाईक अभिजीत कणसे, हवलदार अमित जाधव, सतीश धुमाळ यांनी स्वीकारले.

## जयभवानी शिवजन्मोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी व्यवहारे; सुरवसे उपाध्यक्ष

**मोहोळ** : जय भवानी शिवजन्मोत्सव सार्वजनिक मंडळ मुंढेवाडी या मंडळाच्या अध्यक्ष पदी नागेश व्यवहारे व उपाअध्यक्ष पदी आनंद सुरवसे यांची एक मताने निवड करण्यात आली आहे .यावेळी उपस्थितीत उपसरपंच राहुल व्यवहारे पोलीस पाटील शशिकांत पाटील अमोल व्यवहारे गणेश व्यवहारे सूर्यकांत सोळगे संतोष डोंगरे माऊली पाटील बंडू व्यवहारे ज्योतीराम डोंगरे तुकाराम झांबरे भैया पवार सुभाष ढेरे आदीसह मडळाचे कार्यकर्ते ग्रामस्त मोठय संख्येनेउपस्थित होते.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत २९० लिटर हातभट्टी जप्त

**सोलापूर** : उत्पादन शुल्क विभागाने सोमवारी शहर परिसरात दोन मोटारसायकलींवरुन हातभट्टी दारुच्या वाहतुकीचा गुन्हा नोंदविला असून २९० लिटर हातभट्टी दारु व दोन दुचाकी या कारवाईत जप्त करण्यात आली आहेत. पथकाने एम्प्लॉयमेंट चौक हद्दीत पाळत ठेवली असता पांडूरंग दिगंबर चव्हाण (वय ३२, रा. मुळेगाव तांडा, ता. दक्षिण सोलापूर) यास त्याच्या सुझुकी दुचाकी (एमएच१३ डी १३४२) वरुन दोन रबरी ट्यूबमध्ये १४० लिटर हातभट्टी दारुची वाहतूक करताना अटक केली. त्याच्या ताब्यातून वाहनाच्या किंमतीसह ६७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अन्य एका कारवाईत पथकाने हैदराबाद रस्त्यावर जुना बोरामणी नाक्यासमोर पाळत ठेवून एका दुचाकी (एमएम१३ डीडब्ल्यू ०६०२) वरुन तीन रबरी ट्यूबमधून १५० हातभट्टी दारुची वाहतूक करतांना मुकेश खुबा चव्हाण (वय ३३, रा. मुळेगाव तांडा) यास अटक करुन त्याच्या ताब्यातून ९२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्कलकोट दक्षिण पोलिसांच्या तत्परतेमुळे बालविवाह रोखला

**सुराज्य/अक्कलकोट**



अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाणे हददीत दि.१३ रोजी चाईल्ड हेल्प लाईन १०९८ च्या माध्यमातून व तसेच पोलिस नियंत्रण कक्ष सोलापुर ग्रामीण व महिला शाखा सोलापुर ग्रामीण यांच्या माध्यमातून तडवळ या ठिकाणी होणारा बालविवाह रोखण्यात आला.

पोलिस निरीक्षक महेश स्वामी यांनी सहा. पोलिस निरीक्षक बाबासाहेब काकडे यांना तात्काळ पोलिस ठाण्याकडील एक पथक सोबत घेवुन तडवळ (ता.अक्कलकोट) या ठिकाणी रवाना होण्यास कळविले. सहा. पोलिस निरीक्षक बाबासाहेब काकडे यांनी त्यांच्या सोबत पोलिस ठाण्याकडील एक पथक व तडवळ गावाचे ग्रामविकास अधिकारी दयानंद खोबण यांना सोबत घेवून घटनेच्या ठिकाणी जाऊन पाहणी करून चौकशी केली असता समजले की, यातील बालिका हिचा बाल विवाह करणार असल्याने आम्ही बालिका व तिचे नातेवाईक यांना ताब्यात घेवुन करजगी पोलिस दूरक्षेत्र येथे आणले. या घटनेतील मुलीच्या नातेवाईकाकडे चौकशी केली असता त्यांनी मुलीचा विवाह करणार असल्याबाबत सांगितले.

तेव्हा त्या मुलीचे वयाबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिसानी खात्री करून बालिकेचे वय अठरा वर्षापेक्षा कमी असल्याने त्यांचे लग्न करता येणार नाही, असे समजावुन सांगितले. परंतु मुलीचे भविष्यात गुपचुप लग्न करतील असे वाटत असल्याने व बालविवाह होण्याची शक्यता असल्याने बालिकाचे व त्याचे नातेवाईकाचे समुपदेशन करून व होणारे बालविवाह रोखुन पुढील कार्यवाही करणे करीता अध्यक्ष बाल कल्याण समिती सोलापुर यांच्याकडे पाठवून दिले.

ही कामगिरी पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे,सोलापुर ग्रामीण अप्पर पोलिस अधिक्षक हिंमत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाणे कडील पोलिस निरीक्षक महेश स्वामी, सहा पोलिस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोलिस नाईक नबीलाल मियॉवाले, पोलिस नाईक सुरेश लामजणे, महिला पोलिस अंमलदार रेणुका कोळी व महिला शाखा सोलापुर ग्रामीण यांचेकडील महिला पोलिस अंमलदार अर्चना मस्के यांनी कारवाई केली आहे.

## शिवछत्रपती जन्मोत्सवानिमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल

**सुराज्य/सोलापूर**

शिवछत्रपती जन्मोत्सव निमित्त शहरातील वाहतूक व्यवस्थेमध्ये बदल करण्यात आला आहे.१५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शहरात शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.१८ फेब्रुवारी रोजी रात्री बारा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजन्मोत्सव पाळणा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्या अनुषंगाने जुना पुना नाका ते छत्रपती शिवाजी चौक,सम्राट चौक ते छत्रपती शिवाजी चौक,निराळे वस्ती ते हॉटेल सुप्रभात,मेकॅनिक चौक ते छत्रपती शिवाजी चौक,तरटी नाका ते छत्रपती शिवाजी चौक,काळी मस्जिद ते छत्रपती शिवाजी चौक हा मार्ग बंद करण्यात आला असून,पुना नाका मार्गे हॉटेल ॲम्बेसिडर,निराळे वस्ती मार्गे कल्पना टॉकीज कॉर्नर,तसेच सम्राट चौक बाळीवेसमार्गे टिळक चौक,निराळेवस्ती ते कल्पना टॉकीज कॉर्नर पुढे हे पर्यायी मार्ग दिलेले आहेत.

तर १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात येणार असून सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत नियोजित मार्गावरून मिरवणूक जात असल्याने वाहतूक शाखेने पर्यायी मार्ग सुचवलेले आहेत.सात रस्ता,मोदी पोलीस चौकी,रेल्वे स्टेशन,भैय्या चौक,कल्पना टॉकीज कॉर्नर, निराळेवस्ती, हॉटेल ॲम्बेसिडर ते एसटी स्टँड किंवा जुना पुना नाका येथे जाण्यास व येण्यास मार्ग निश्चित केला आहे.तसेच सात रस्त्यावरून रंगभवन, सिव्हील चौक,शांती चौक,जुना बोरामणी नाका,मड्डी वस्ती,जुना तुळजापूर नाका मार्गे,जुना पुना नाका असा बदल करण्यात आला आहे.या आदेशाची नागरिकांनी पालन करावे असे आदेश पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी दिले.



## जनसेवेसाठी स्वत:ला झोकून देणाऱ्यांचाच इतिहास घडतो; कोऱ्हाळे

**सुराज्य/अकलूज**

जनसेवेसाठी स्वतःला झोकुन देणऱ्या माणसांचाच इतिहास घडतो, सहकार महर्षींनी जनकल्यानाचा वसा जोपासला म्हणूनच त्याचे नाव अजरामर झाले.डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील हे जनसेवा संघटनेच्या माध्यमातुन आपल्या पुर्वजांचा वारसा पुढे घेवुन जात आसल्याचे वक्तव्य अशोक कोऱ्हाळे यांनी केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त अकलूज येथील विजय चौकात पुण्यतिथी समिती व महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या वतीने निरंकारी सत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी निरंकारी मिशनचे ज्ञानप्रचारक अशोक कोऱ्हाळे यांनी मुख्य विचारपीठावरुन बोलताना सहकार महर्षींच्या कार्याला उजाळा दिला.याप्रसंगी आहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पदमजादेवी मोहिते-पाटील,सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील,चेरब्स स्कुलच्या चेअरमन सौ.उर्वशीराजे मोहिते-पाटील,माणिकराव मिसाळ,शिवाजीराव इंगवले देशमुख,आण्णासाहेब इनामदार, आण्णासाहेब शिंदे,सतिश पालकर,राजाभाऊ गुळवे,रणजीतसिंह देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प.पु. अशोक को-हाळेजी म्हणाले की,मिळालेला मनुष्य जन्म सार्थकी लावायचा असेल तर मानवतेची सेवा करुन सत्कार्य करावे.

या कार्यक्रमासाठी सोलापूर,सातारा,पुणे जिल्ह्यातील हाजारो निरंकारी अनुयायी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गायकवाड सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवादल युनिट ८२५ चे सेवदल यांचेसह विनायक माने, दिलीप कांबळे, सुधीर रास्ते, मयुर माने, दिपक सुत्रावे, राहुल जाधव, दिलीप सकट, श्रीमंत लांडगे, यांनी परिश्रम घेतले.

## पंढरपूर येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

**सुराज्य/पंढरपूर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे अन् चि. कु.रुद्रांश श्रीकांत शिंदे या शिंदे घराण्यातील तीन पिढ्यांच्या सदस्यांच्या वाढदिवसांनिमित्त बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर येथे २ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर तथा नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



प्रारंभी प्रमुख पाहुणे ॲड आशुतोष बडवे, विरेंद्रसिंह उत्पात, विनय मदन महाराज हरिदास यांनी दिप प्रज्वलन केलं.याप्रसंगी स्थानिक नागरिक तसेच माघ यात्रेच्या निमित्ताने आलेल्या वारकऱ्यांची नेत्र तपासणी, रक्तदाब तपासणी, हृदयरोग तपासणी, ईसीजी,रक्त तपासणी करण्यात आली.

या शिबिराचा सुमारे १३०० लोकांनी लाभ घेतला. अनेकांनी यावेळी रक्तदान देखील केले. यावेळी सर्वांना मोफत औषधोपचार करण्यात आले. आरोग्य शिबिराच्या आयोजनासाठी वारकरी लोकांनी समन्वयक -पंढरपूर तालुका शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष मनिषा प्रसाद वासकर यांचे आभार मानले. रेखा चंद्रराव व भारत मुढे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी लाईफ लाईन हॉस्पिटल, सिव्हील हॉस्पिटल, विठ्ठल हॉस्पिटल मधील डॉक्टर, लनर्सेस व अन्य कर्मचाऱ्यांनी खूप मेहनत घेतली. याप्रसंगी शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाचे सूरज जम्मा (मोहोळ), रोहन बलक्षे (माढा), स्वप्नील गुजर (माळशिरस) हे आपल्या कक्षाच्या कार्यकर्त्यांसह उपस्थित होते.

## घर जागेच्या कारणावरून भावाभावात भांडण

**सोलापूर** : घर जागेच्या कारणावरून दोन सख्या चुलत भावात मारामारी झाल्याची घटना मड्डी वस्तीत घडली. शिवाजी सदाशिव फुलझळके (वय-५२,रा.मड्डी वस्ती,पठाणसाब दर्गासमोर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार विरेशन लक्ष्मण फुलझळके वं ऋषिकेश लक्ष्मण फुलझळके (दोघे रा. सोलापूर) या दोघा चुलत भावाने आपल्या नावाने मड्डी वस्तीत असलेल्या बंद घराच्या दरवाजाचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करींत छतावरील पत्रे काढून हे आमचे घर आहे.असे म्हणत दमदाटी केली.अशा आशयाची फिर्याद जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोहर हे करीत आहेत.

## बेकायदेशीर रित्या घरगुती गॅसचा वापर

**सोलापूर** : बिग बझार समोरील हॉटेल सेंटर पॉईंट येथे बेकायदेशीरित्या घरगुती गॅसचा वापर केल्याप्रकरणी रविराज जगन्नाथ उपलप (वय-४०,रा.बिग बाजार समोर,मोदीखाना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १२ फेब्रुवारी रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान घडली.अशा आशयाची फिर्याद सोमनाथ सुरवसे यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.घटनेचा पुढील तपास पोसई माळी हे करीत आहेत.



## भंडारकवठ्यात भक्तीभावाने ग्रामदैवत भेटीचा सोहळा

**सुराज्य/सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकठे येथे रूढी- परंपरेनुसार चालत आलेला दोड्डहब्बा निमित्त भंडारकवठे येथील ग्रामदैवत पिरमहासिद्ध देवाचे भेट सोहळा मोठ्या भक्तीभावाने व उत्साहाने संपन्न झाला.

दोड्डहब्बा हे दोन दिवसाचे असून आज शेवटच्या दिवशी सुफी संत खाजा खुतबोद्दिन पिरसाहब व श्री शिवयोगी महासिद्ध देवांची भेट सोहळा पाहाण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांची एकच गर्दी केली होती.भंडारकवठे येथील रूढी परंपरेनुसार चालत आलेला दोड्डहब्बा कार्यक्रम अत्यंत भक्तीभवाने व भंडाराच्या उधळणाने संपूर्ण बाजारतळ भंडारामय झाला यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते दोड्डहब्बाचे आयोजन कल्लाप्पा नामदेव अजावडरे यांनी केले होते. या भेट सोहळ्यात भंडाराची उधळण हलगी नाद व फटाक्यांची आतिषबाजीने सकाळी सुरू असलेला भेटसोहळा तब्बल दोन तासांनी संपन्न झाले. यंदाच्या दोड्डहब्बा पाहाण्यासाठी पहिल्यांदाच मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. भेटसोहळा संपन्न झाल्यानंतर रुढी-परंपरेनुसार भंडारकवठे गावातील

व पंचक्रोशीतील नागरिकांनी भाकरी-आमटी-कांदा या महाप्रसादाचा आस्वाद घेऊन मन तृप्त झाल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे जेव्हा भाकरी-आमटीचा-कांदा महाप्रसादला सुरूवात होतो त्यावेळी भंडारकवठे गावातील बारा बलुतेदार उपस्थित असणे आवश्यक आहे एखादा तरी बलुतेदार गैरहजर असल्यास तो जोपर्यंत येत नाही तोपर्यंत महाप्रसादाला सुरुवात होत नाही. ही रूढी परंपरेनुसार चालत आलेली परंपरा आहे.संपूर्ण गाव परिसरातील नागरिक भक्तीत तलीन झाले. राष्ट्रीय ऐक्य साधत गावातील नागरिकांनी असा नयनरम्य भेट सोहळा मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने सुरळीत पणे पार पडले.या कार्यक्रमाला मंद्रुप पोलीस स्टेशनचे साहाय्यक पोलीस निरिक्षक रविंद्र मांजरे यांनी शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

## उत्तर सोलापूर खरेदी विक्री संघाच्या चेअरमनपदी जगताप, शिंदे उपाध्यक्ष

**सुराज्य/उत्तर सोलापूर**



उत्तर सोलापूर तालुका खरेदी विक्री संघाच्या चेअरमपदी जयकुमार जगताप यांची तर व्हाईस चेअरमनपदी मुरलीधर शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर संघाचे मार्गदर्शक तथा माजी आमदार दिलीप माने यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

उत्तर सोलापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली चेअरमन व्हाईस चेअरमन निवडणूक निर्णय आधिकारी आर.एल. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी चेअरमनपदासाठी जयकुमार वामनराव जगताप व्हाईस चेअरमनपदासाठी मुरलीधर संदीपान शिंदे यांचे एकमेव अर्ज दाखल झाल्याने यांची निवड बिनविरोध झाली.

सहकार तपस्वी स्व. ब्रह्मदेवदादा माने यांनी उत्तर सोलापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली तर संघामार्फत ग्राहक भांडार, वस्त्र भांडार, खते औषधे, मशनरी, भुसार, भाजीपाला विभाग, स्वस्त धान्य दुकान आदी विभाग चालवुन संघाला वैभव मिळवून दिले. यावेळी संघाचे संचालक महादेव जाधव, नितिन भोपळे, मुंकुद गरड, विजय वानकर, ओकांर शिंदे, रविंद्र शिंदे, मारुती गोरे, विष्णू वाघमारे, प्रताप टेकाळे, मंजुश्री बचुटे-भोसले,सौ.उषा सुरवसे यांचेसह तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते

## आंतरशालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत ७०० जणांचा सहभाग

**सुराज्य/सोलापूर**



जिल्हा योग परिषदेने आयोजित केलेल्या आंतरशालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत सोलापुरातील २४ शाळांनी ५५ गटांमध्ये सहभाग नोंदविला. यात एकूण ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

योगसाधना मंडळ व इनरव्हील क्लब स्टारलेट सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नू. म. वि. प्रशालेत आयोजित केल्या होत्या.पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे मुलांचे आणि मुलींचे वयोगट होते. गटनिहाय निकाल पुढीलप्रमाणे : पहिली ते चौथी मुले - प्रथम - चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळा, द्वितीय - पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूल, तृतीय - म. फ. दमाणी प्राथमिक शाळा, मुली - प्रथम - इंडियन मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल, द्वितीय - विवेकानंद पब्लिक स्कूल, तृतीय - चतुराबाई श्राविका प्राथमिक शाळा. पाचवी ते सातवी मुले - प्रथम - रा. ना. इप्पाकायल प्राथमिक शाळा, द्वितीय - पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूल, तृतीय - बी. एफ. दमाणी विद्यामंदिर, मुली - प्रथम - रा. ना. इप्पाकायल प्राथमिक शाळा, द्वितीय - आंबेडकर मेमोरियल स्कूल, तृतीय - वि. मो. मेहता प्रशाला, आठवी ते दहावी मुले - प्रथम - बी. एफ. दमाणी हायस्कूल, द्वितीय - जैन गुरुकुल, तृतीय मेहता प्रशाला, मुली -प्रथम - जैन गुरुकुल, द्वितीय - वि. मो. मेहता प्रशाला, तृतीय - बी. एस. कुलकर्णी हायस्कूल. रोहिणी उपळाईकर, श्वेता पाटील व स्नेहल पेंडसे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. योग परिषदेच्या २० पंचांनी या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले. सरस्वती कालाणी यांनी स्पर्धा प्रमुख म्हणून काम पाहिले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TIME EXTENSION NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000026051 E-Tender No.:** EE/400kV/R.S/DN/LBT/-Tender: 09/2022-2023 **Particulars:** Work of providing & fixing of motorized isolators drive mechanism box type - MT 50 for 220 kV ABB make motorized isolator installed at 400 kV R.S. Division, Lamboti. **Estimated Cost:** Rs. 13,22,040/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 13,220/- **Tender Cost:** Rs. 500/- + 5% GST i.e. 525/- **Sale Period:** 08.02.2023 to 15.02.2023 **Last Date of Submission:** 15.02.2023 up to 12:00 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 16.02.2023 at 13:00 Hrs (If possible).

**Contact Person:** Executive Engineer - 7447441034.

For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400 kV R.S. Div., Lamboti**

CMYK



## शिवसेनेच्यावतीने सावंत यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

**अक्कलकोट** : शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ व जिल्हा प्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्ह्यप्रमुख, सतोष केगांनाळकर, तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या प्रतिमेचे जोडे मारो आंदोलन करण्यात आले. युवा सेनेचे प्रमुख,करोडो शिवसैनिकांचे दैवत आदित्य ठाकरे यांच्या बद्दल अपशब्द वापरले होते, त्याच्या निषेधार्थ त्यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करून जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी आपल्या मनोगतात कडाडून टीका केली, तसेच तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे यांनी गद्दार आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी आपले वक्तव्य मागे घ्यावे, अन्यथा अक्कलकोट तालुक्यात पाय ठेऊन देणार नाही असा इशारा दिला.यावेळी अक्कलकोट तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे, उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, सोलापूर दक्षिण विधानसभा उपजिल्हाप्रमुख संतोष केंगनाळकर, तालुका संघटक सोपान निकते ,शहर प्रमुख मल्लिनाथ खुबा, तालुका उपप्रमुख श्रीशैल स्वामी, तालुका उपप्रमुख गुरनिंगप्पा पाटील, मैंदर्गी शहर प्रमुख मल्लिनाथ अरवतकल, संघटक हणमंत नागुरे, रफिक मुजावर, अयाज जमादार ,जितु अनंत पुरे, कामगार सेना प्रमुख मंजुनाथ हडपद, नितीन मोरे,बसु पुजारी, तालुका सोशल मिडिया प्रमुख सिध्दु गुब्याड, लक्ष्मीपुत्र कुंभार, विशाल हतरकर, शिवचलप्पा अरवतकर, शेडम शांतू आरवटकर, मुरगेंद्र मुडंनकेरी उपस्थित होते.

## कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी शेतीशाळा

**सांगोला** : आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष २०२३ अंतर्गत वाणी चिंचाळे तालुका सांगोला येथे महिला शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाने भारत सरकारने हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करत आहे, ज्वारी, बाजरी, राळा,वरी,इत्यादी पिकांचे महत्त्व सांगण्यात आले. यांच्या वापरामुळे शरीरात अनेक फायदे होतात असे यावेळी उपस्थित तज्ञांच्या मार्गदर्शनातुन सांगण्यात आले. तसेच अनेक महिला शेतकऱ्यांना शासनाच्या मार्फत महाडिबिटी अंतर्गत शेतकऱ्यांसाठी राबविण्याता येणाऱ्या योजना, यावर सविस्तर असे मार्गदर्शन करण्यात आले.तसेच बचतगट ज्याप्रमाणे आहेत त्याप्रमाणे शेतकरी गट स्थापन करावे असते सांगितले .त्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी सर्व कृषी विभाग तत्पर राहील असे सांगितले. महिलांना आपल्या दैनंदिन आहारात या घटकांचा समावेश होण्यासाठी आपण आपल्या शेतात हि पिके घ्यावीत असा सल्ला यावेळी दिला. आधुनिक काळात सर्वांनी भरड धान्य आपल्या आहारात घ्यावे आणि शेतकऱ्यांना सहकार्य करावे तसेच आपल्या आरोग्यात सुधारणा कराव्यात असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## निधन वार्ता

### संभाजी खंडागळे



**वेळापूर** : निराळे वस्ती येथील संभाजी खंडागळे (वय-८०) यांचे अल्पशा निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### पै.माधव चव्हाण



**सोलापूर** : पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील पै.माधव नारायण चव्हाण(वय ५१) यांचे दु:खद निधन झाले. तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालिका आणि पंचायत समिती सदस्य उमादेवी चव्हाण यांचे ते पती होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ केशव चव्हाण असा परिवार आहे.

### प्रद्युम्नभाई गांधी



**अकलूज** : अकलूज येथील प्रद्युम्नभाई श्रेणीक गांधी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. ते ७८ वर्षांचे होते.माळशिरस तालुका केमिस्ट्री ड्रगिस्ट असोसिएशनचे गेली अनेक वर्षे तालुकाध्यक्ष पद भूषवले होते तसेच अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सदस्य होते व सकस जैन समाजाचे अध्यक्ष होते. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### कमलाबाई कुचन



**सोलापूर** : साखर पेठ येथील रहिवासी कमलाबाई मधुकर कुचन (वय ८१) यांचे सोमवारी १२ फेब्रुवारी २०२३ रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे आहेत. माजी खासदार गंगाधरपंत कुचन यांच्या त्या स्नुषा होत व मोहन व भास्कर कुचन यांचे मातोश्री होत. शांती चौक पद्मशाली स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### तारामती दोडतले



**सोलापूर** : आई तुळजाभवानी ची भक्त अशी ओळख असणाऱ्या आदित्य नगर येथील रहिवासी असलेल्या तारामती दत्तात्रय दोडतले यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी, जावाई, नातवंडे असा परिवार असून धनगर समाजाचे सामाजिक कार्यकर्ते नितीन लवटे त्यांच्या त्या आजी होत.

### चंद्रभागा बोरगांवकर



**सोलापूर** : चंद्रभागा गिरीधर बोरगांवकर याचे वयाच्या ७३ व्या वर्षी अल्पशा आजाराने विडी घरकूल कुंभारी येथे राहत्या घरी दुखद निधन झाले. असून त्याच्या पश्चात ४मूले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार होता.

# बारामतीकरांनी दुष्काळी भागाचे पाणी पळविले : शेखावत

सुराज्य/पंढरपूर

**नीरा देवघर धरणातील पाणी बारामतीकरांनी नियम डावलून पळविले आहे. यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळावे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी व जलशक्ती मंत्रालयाने पाण्याकडे लक्ष दिले आहे. नीरा देवघर धरणातील पाण्याचा पुन्हा सर्व्हे करण्यात येणार आहे. ते पाणी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. याचा लाभ पंढरपूर, फलटण, माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार असल्याचे केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी सांगितले.**



पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक उपस्थित होते.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री शेखावत म्हणाले की पश्चिम महाराष्ट्रातील पंचगंगा, कृष्णा, कोयना नदीतून पावसाळ्यात वाया जाणारे पाणी वळवून ते दुष्काळी भागात असलेल्या ६ जिल्ह्यातील व ३१ तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

मात्र ही योजना जलनिती आयोगाने थांबविली आहे. तेलंगणा व आंध्रप्रदेश यांच्यात पाण्यावरून वाद सुरू आहे. या बाबत तेलंगणाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही याचिका काढून घेण्यास सांगण्यात आले आहे. ती काढून घेतल्यानंतर तेलंगणा व आंध्रप्रदेशातील वाद मिटल्यानंतर कृष्णा- भीमा स्थिरीकरण योजनेवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या योजनेसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर जलशक्ती मंत्रालयाची बैठक होईल व कृष्णा-भीमा स्थिरीकरण कामास सुरवात होईल असे आश्वासन दिले.तसेच पाऊस काळात मोठ्या प्रमाणावर भीमा नदीत सोडण्यात येणारे जादा पाणी पुढे अलमट्टीत जाऊन समुद्राला मिळत असल्याने याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. याबाबत नियोजन करून याचा लाभ शेतकऱ्यांना कसा होईल याबाबतचे काम सुरू असल्याचे शेखावत यांनी सांगितले.

माढा लोकसभा मतदारसंघाच्या सन २०१९ च्या निवडणूक प्रचारात अकलूज येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वासन दिले होते. दुष्काळी भागाला पाणी देण्यासाठी जलशक्ती मंत्रालयाची स्थापना करू असे जाहिर केले होते. त्यानुसार मंत्रालय स्थापन करण्यात आले. सोमवारी केंद्रिय जलशक्ती मंत्री गर्जेंद्रसिंह शेखावत पंढरपूर दौऱ्यावर आले होते.




## साने गुरुजी गौरव पुरस्कार बिज्जरगी यांना प्रदान

सुराज्य/सोलापूर

विजय बिजरगी यांना साने गुरुजी गौरव पुरस्कार प्रदान अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूर यांच्यावतीने देण्यात येणारा साने गुरुजी गौरव पुरस्कार जीवन विकास प्रशाला भंडारकवठे येथे कलाशिक्षक बालसाहित्य लिहिणारे विजय बिज्जरगी यांना ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी व गजानन कोठेवार वर्धा यांच्या हस्ते समाज कल्याण केंद्र सोलापूर येथे प्रदान करण्यात आले .

या कार्यक्रमास एम डी कमळे, चिदानंद जवळकोटे, शैल कक्कड मेली, आप्पासाहेब बबलेश्वर, रंगसिद्ध दसाडे,अशोक मामाने, अशोक खानापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. आरती काळे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## श्री चंद्रादेवी यात्रा महोत्सवास २३ रोजी सुरू होणार

**अक्कलकोट** : तालुक्यातील किरनळ्ळी येथील श्री चंद्रादेवी यात्रा महोत्सव दर सालाबादप्रमाणे यंदाही २३ ते २५ फेब्रुवारी पर्यंत सुरूवात होणार आहे. या दरम्यान २३ फेब्रुवारी २०२३ रोजी संध्याकाळी सात वाजता पालखी व घोडी किरनळ्ळी वरून भुरीकवठेला जाणार आहे. २४ फेब्रुवारी रोजी पालखी व नवीन रथ भुरीकवठे येथून किरनळ्ळी येणार व संध्याकाळी आठ वाजता महादेव मंदीराकडे पालखी व घोडी जाऊन येणार त्यानंतर शोभेचे दारूगोळा कार्यक्रम संपन्न होणार आहे. रात्री १० वाजता मराठी नाटक मंगळसुत्रसंपन्न होणार आहे. २५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता रथ उत्सव संपन्न होणार आहे. सायंकाळी ५ वाजता जंगी कुस्ती आहेत व रात्री १० वाजता मराठी नाटक मंगळसूत्र होणार आहे. दोन्ही दिवशी महाप्रसाद वाटप आहे. अशी माहिती यात्रा महोत्सव पंचकमिटीनी दिली.

## लेफ्ट राईट लेफ्ट नाटकाचा थाटात शुभारंभ

सुराज्य/सोलापूर



लेफ्ट राईट लेफ्ट नाटकाच्या माध्यमातून सोलापुरातील तरूण कलाकारांनी एकत्र येत आहे. तरूण मंडळी डिजिटल युगात वावरत असताना नाटकालासुध्दा अगदी प्राधान्यक्रम देत व्यवसायिक स्वरूपात प्रेक्षकांसमोर येण्याचे धाडस करत आहेत असे गौरोद्गार नाट्य परिषदेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांनी केले.

नाटकाचा शुभारंभ हुतात्मा स्मृती मंदिरात नाट्य परिषदेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रशांत बडवे, ज्येष्ठ नाट्यकलांवत शोभा बोल्ली, प्रा.नरेंद्र काटीकर, निर्माता युवराज माळगे, लेखक अहमद शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन बळवंत जोशी यांनी केले. अहमद शेख लिखित आणि दिग्दर्शित लेफ्ट राईट लेफ्ट या नाटकाच्या माध्यमातून एका वेगळ्या विषयाला हात घालण्याचा प्रयत्न केला आहे. देशात अखंडता आणि एकता टिकून राहावी, राष्ट्र प्रथम हे ब्रीद घ्यावे आणि देशातल्या प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित आणि सन्मानित जीवन मिळावे. हिंसेला कुठेही थारा न देता हिंसा थांबवण्यासाठी शक्य ते प्रयत्न करावेत. समाजात घडणाऱ्या घटना, आंदोलने, चळवळी ह्या मानवाच्या कल्याणासाठी असाव्यात ह्या चळवळी-आंदोलने माणूस आणि माणुसकी संपवण्यासाठी नसाव्यात. गोर, गरीब, दीन, दलितांसाठी काम करत असाताना त्यांनाच संपवण्याचा घाट घालणारी सडकी विचारबुध्दीही नसावी. बुध्दाची अहिंसा आणि सम्राट अशोकाचे शौर्य या दोन्हींचा मिलाफच या देशाच्या अखंडतेला तारू शकतो मात्र त्यात दुबळ्यांप्रति हिंसा नसावी, देशाच्या सुरक्षेसाठी वेळप्रसंगी शस्त्र उचलावे पण ते शस्त्र उचलत असताना निष्पापांचा बळी जाता कामा नये. अशा प्रकारचा संदेश या नाटकातून आम्ही देण्याचा प्रयत्न केला आहे, असे शेख यांनी सांगितले. निर्माता युवराज माळगे यांनी मान्यवरांचे अभार मानले.




## बांधकाम मजुरांसाठी मध्यान्ह भोजनाचा शुभारंभ

सुराज्य/सोलापूर

तालुक्यातील हसापुर येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ अंतर्गत मध्यान्ह भोजन योजना सुरुवात करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थ वटवृक्ष देवस्थान समिती अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते या योजनेला सुरुवात करण्यात आली.

कष्टकरी माणसाला अन्नाचे महत्त्व अधिक समजते,अन्न आपण शक्ती समजतो,अन्नाशिवाय तर जीवनच नाही.कामगार काबाडकष्ट करतात त्यांच्या आरोग्यासाठी व कष्ट करण्याची ऊर्जा मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने मध्यान्ह भोजन योजना ही संकल्पना अमलात आणली आहे. शासनाच्या विविध योजना असतात,त्या तळागाळातील घटकापर्यंत पोहचल्या पाहिजेत या हेतूने त्याचाच एक भाग म्हणून आमच्या गावाचे सुपुत्र आरोग्य सेवक श्रीकांत स्वामी यांनी प्रयत्न करीत ही योजना गावात आणली आहे. भविष्यात आपण सर्वोतपरी मदत करणार असल्याचे प्रतिपादन श्री.महेश मालक इंगळे यांनी केले. या योजनेचा हसापुर गावातील बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारासह इतर कामगार या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीकांत स्वामी यांनी केले आहे.

यावेळी रामलिंगय्या स्वामी (आरोग्य सेवक) बाबू शेख (माझी सरपंच), मारुती घटकांबळे (ग्रा.प.सदस्य), गुरुशांतप्पा पाटील, सुरेश जाधव,जयवंत चव्हाण, राजशेखर स्वामी, गणेश सुतार, दिगंबर सोनकांबळे (पो.पाटील) महेश कामाठी (तंटामुक्त समितीअध्यक्ष) योगेश सुतार,लक्ष्मण बेंद्रे,गणेश पाटील,अप्पा शिंदे,सोमलिंग म्हेत्रे,बलभीम बेंद्रे,मोहन शिंदे, परमेश्वर शिंगे,खाजाप्पा धसाडे व सर्व मित्र परिवार तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णगोपाळ गुरव तर डॉ. रामलिंगय्या स्वामी यांनी आभाप्रदर्शन केले.

## जावयाने केले विष प्राशन

**पेनूर** : (ता. मोहोळ) येथे राहणाऱ्या अनिल बाबुराव बंडगर (वय ३५) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हे घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी लहू जाधव (मामा) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. अनिल याची सासू आणि मेहुणा यांच्या त्रासाला कंटाळून त्याने हा प्रकार केला.

## शिक्षक समितीच्या अधिवेशनासाठी माढा तालुक्यातून ७००हून अधिक शिक्षक जाणार : काशीद

सुराज्य/माढा



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वेंगुर्ला जि सिंधुदुर्ग येथे दिनांक १६ व १७ फेब्रुवारी रोजी होत असलेल्या त्रैवार्षिक अधिवेशनासाठी माढा तालुक्यातील जवळपास ७०० हून अधिक शिक्षक जाणार असल्याची माहिती तालुका अध्यक्ष कैलास काशीद यांनी दिली.

सद्यस्थितीत राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित असून यावरती सामुहिक रित्या राज्याच्या प्रमुख पदाधिकार्यांच्या समवेत प्रत्यक्ष संवाद साधत मार्ग काढला जाणार आहे .

या अधिवेशनासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शिक्षणमंत्री दिपक केसरकर ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन केंद्रीय मंत्री नारायण राणे पालकमंत्री रवींद्र चव्हाण खनिकर्ममंत्री दादा भुसे उद्योगमंत्री उदय सामंत आदिसह शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष सरचिटणीस उपस्थितीत राहणार आहेत.

तरी माढा तालुक्यातून जास्तीत शिक्षकांनी अधिवेशनासाठी सहकार्य करीत उपस्थित राहण्याचे आवाहन सरचिटणीस वामन गायकवाड यांनी केले आहे.

# शिवरत्न पॅटर्नने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला : शितलदेवी

सुराज्य/अकलूज



आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे होते यासाठी शिवरत्न पॅटर्नच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परिपूर्ण करण्यासाठी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये गुणवत्ता निर्माण केली असल्याचे मत शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा या निर्णायक वळणावर करिअरच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे यासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील व अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार शिवरत्न पॅटर्नच्या वतीने दहावी व बारावी नंतर करीअरच्या संधी या विषयावर विद्यार्थी व पालक यांचेसाठी शिक्षणतज्ज्ञ सारिका मोहन पाटील यांचे वैद्यकिय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा या विषयावर मार्गदर्शन सेमिनार व शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षा २०२२ बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

तुमच्याकडे असलेल्या क्षमता, मिळणारे ज्ञान, या क्षेत्रातील आव्हानं तसचं तुमच्या अभ्यासाचा उपयोग हे पाहून करिअर निवडावे. त्यासाठी शिक्षणतज्ज्ञ सारिका पाटील यांचे मार्गदर्शनाची लाभले.

शिवरत्न पॅटर्नच्या वतीने इ.१० वी मधील विद्यार्थ्यांसाठी शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षा' आयोजित करण्यात आली होती या वेळेस परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.सदर कार्यक्रमासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष शितलदेवी मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉक्टर विश्वनाथ आवड, श्रीकांत राऊत, दत्तात्रय लिके, प्रशांत जगताप, अनिल जाधव, तानाजी काशिद, नितीन बनकर प्राचार्य अरविंद कुंभार, उपप्राचार्य डॉ.महेश ढेंबरे, अश्रफ शेख व समन्वयक राजकिरण माने व इतर मान्यवर उपस्थित होते. या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १०,०००/- रुपये, द्वितीय क्रमांकास ७०००/- रुपये, तृतीय क्रमांकास ५०००/- रुपये तर उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०००/- रुपये व प्रमाणपत्र तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक रोहित देशमुख यांनी केले तर प्रस्तावना समन्वयक राजकिरण माने देशमुख यांनी केले.

चि.शिवराज सुरवसे, पुरंदावडे- प्रथम क्रमांक, चि.हर्ष गांधी,अकलूज - द्वितीय क्रमांक, चि.अदर्श घाळे, नातेपुते - तृतीय क्रमांक, कु.साक्षी गोरे, नातेपुते, -तृतीय क्रमांक, कु. प्राची रणनवरे , फळवणी - उत्तेजनार्थ, चि.राज फडे, अकलूज- उत्तेजनार्थ, कु.श्रुती नरवणे, संग्रामनगर - उत्तेजनार्थ, कु.सृष्टी भोसले ,फळवणी- उत्तेजनार्थ, कु.अनुष्का केदारी - सवतगव्हाण - उत्तेजनार्थ, चि.आर्यन मगर , यशवंतनगर - विशेष प्राविण्य, चि.साहील देवडे, अकलूज - विशेष प्राविण्य.



## भाकरेवाडीचा शालेय पोषण आहार सजला परसबागेतील भाज्यांनी

**वेळापूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाकरेवाडी पिसेवाडी (ता.माळशिरस) येथील शालेय परिसरात शिक्षक विद्यार्थ्यांनी फुलवलेली परसबाग शाळेच्या लौकिकात भर घालत आहे. कृतीतून शिक्षणाचे धडे आणि शालेय पोषण आहारासाठी सेंद्रिय पद्धतीने पिकविलेला भाजीपाला वापरता यावा हेतूने शाळेतील मुख्याध्यापक शामराव जाधव, विषय शिक्षक आबासाहेब देवकते, शिक्षिका अमृता गुंड आणि आशा भारती यांनी पालक सहकार्यातून परसबाग या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केली.या कामी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब भाकरे यांनी ट्रॅक्टरने फणून दिली. शिक्षक विद्यार्थ्यांनी दगड गोटे वेचले. आसपासच्या शेतकऱ्यांच्या मदतीने भाजीपाल्यासाठी बियाणे शेणखत व रोपे मिळवली आणि परसबागेत भाज्यांची लागवड केली गेली. शाळेच्या चाळीस ते पन्नास मुलांना पुरेल एवढा भाजीपाला तांदूळसा, माठ, मेथी, पालक परसबागेतून वापरला जातो. परसबागेची शोभा वाढवायला मिरची टोमॅटो ढोबळी मिरची भोपळा या फळभाज्याही पोषण आहाराची चव वाढवण्यासाठी सज्ज आहेत. मुलांच्या मदतीने वेळच्यावेळी भाजीपाला काढून तो स्वच्छ केला जातो. माळशिरस तालुक्यात विविध पालेभाज्या आणि फळभाज्यांनी युक्त पहिली परसबाग भाकरेवाडी शाळेत कार्यान्वित केल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, शिक्षण विस्ताराधिकारी सायरा मुलाणी, केंद्रप्रमुख राजू घाडगे यांनी अभिनंदन केले.

## उड्डाण पुलाखालील जाळी तोडणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**मोहोळ** : मोहोळ शहरातील उड्डाणपुलाखाली लावण्यात आलेली जाळी तोडणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी दलित स्वयंसेवक संघाच्या वतीने करण्यात आली आहे याबाबत सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्यालयाला निवेदन देण्यात आले आहे. मोहोळ शहरातून जाणाऱ्या नॅशनल हायवे क्रमांक ६५ च्या उड्डाणपुलाखाली चारही बाजूने जाळी कंपाऊंड बसवण्यात आले आहे तत्कालीन आमदार रमेश कदम यांनी लोकांच्या हितासाठी ती जाळी काढावी अशी मागणी केली होती व त्यांनी जाळी प्राधिकरण अधिकाऱ्यांना बोलु कल्पना देऊन तोडली होती तेव्हा त्यांच्यावर शासकिय मालमत्तेचे नुकसान केले म्हणून त्यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते सध्या नव्याने मोहोळ पोलीस ठाण्याची सूत्रे घेतलेली पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी यांनी या ठिकाणी ती जाळी तोडून काढली आहे, असे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे. ती जाळी तोडून त्या ठिकाणी वाहनांची पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे सदर वाहनाची कशाच्या आधारे पार्किंग करण्यात आलेले आहे त्यामुळे जाळी तोडणारे अधिकारी व कर्मचाऱ्यावर व परवानगी देणाऱ्या प्राधिकरण अधिकारी त्यांच्यावर कारवाई झालीपाहिजे. तसे न झाल्यास दलित स्वयंसेवक संघाच्या वतीने उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस दिनकर उर्फ दिनेश दिनकर माने जिल्हा अध्यक्षफकीरा जाधव मोहोळ तालुका अध्यक्ष सुरेश लोखंडे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मिलिंद अष्टुळ यांच्या सह्या आहेत



## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी छावा संघटनेचा रास्ता रोको

**उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील रानमसले येथे आखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी रास्ता रोको आंदोलन जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांच्या नेतत्त्वाखाली करुन पोलिस उपनरीक्षक निंबाळकर, तहीलदार जयवंत पाटील यांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात विदयुत पुरवठा सुरळीत करणे, अतिवृष्टींचे अनुदान त्वरित जमा करा, कांदयाला हमी भाव व अनुदान द्या व इतर मागण्याचे निवेदन उत्तर तहसीलदार जयवंत पाटील यांना देण्यात आले. यावेळी माजी सरपंच नितीन गरड, उपसरपंच रमेश सुतार, तालुकाध्यक्ष अविनाश गरड, राजाराम गरड, भैरवनाथ हावळे, सुनील शिरसाट, लक्ष्मण शिंदे, प्रभाकर गायकवाड, किरण वाघमारे, नंदू पाटील, तात्या पाटील, इक्रम करंडे, बाबाराजे गरड, अमोल गरड, जगन्नाथ गरड, करण गरड, शैलेश् साठे, विराज कदम, गणेश पाटील, विठ्ठल साबळे, ऋषी बारस्कर, निलेश देशमुख, नंदकुमार गरड, धनाजी गरड, शिवाजी गरड, ओंकार गरड, शंकर पाटील, राज गरड शेतकरी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीत २५० प्रकरणे निकाली

सुराज्य/पंढरपूर

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शनिवार दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये २५० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये ४ कोटी १२ लाख २९ हजार ८६९ रुपयांची तडजोड करण्यात आली. तसेच सुमारे २० वर्ष ६ महिन्यांपासुन प्रलंबित असणारे दिवाणी अपील तडजोडीअंती निकाली निघाले असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली.**

- लोकअदालतीत ४ कोटी १२ लाख २९ हजार रुपयांची तडजोड
- तब्बल २० वर्षापूर्वीचा जमीन वादाचे अपील निकाली



जिल्हा व सत्र न्यायालय, पंढरपूर येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. बी. तोष्णीवाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ मध्ये सन २००२ मध्ये दाखल असलेले जमीनीच्या वादाचे अपील हे तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. मौजे कासेगाव (ता.पंढरपूर) येथील जमीनीच्या वादाचे अपील होते. अपीलार्थी व उत्तरार्थी यांनी सदरचे अपील निकाली करणेसाठी तडजोडसाठी दाखल करुन आपआपले क्षेत्राची कायदेशिर फाळणी व मोजणी करुन घेण्यास संमती दर्शविल्याने सदरचे अपील तंडजोडीअंती निकाली निघाले आहे.

लोकअदालतीसाठी एकुण ५ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश- बी. बी. तोष्णीवाल, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. ए. खंडाळे, दिवाणी न्यायाधीश एम. आर. कामत, दिवाणी न्यायाधीश श्रीमती टी. जी. बन्सोड तसेच दाखलपूर्व प्रकरणांच्या पॅनलमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर. एम. आर. जाधव यांनी काम पाहिले. तत्पुर्वी राष्ट्रीय लोकअदातीचे उद्घाटन करुन नागरिकांमध्ये लोक अदालतीमध्ये लोक अदालतीचे असणारे महत्वाची माहिती देण्यात आली. सदर प्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष श्री. भगवान मुळे व श्री. एम. एम. नाईकनवरे उपाध्यक्ष हे उपस्थित होते.

सदर लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## तळेहिप्परगा येथे खाणीतील पाण्यात बुडून वृद्ध इसमाचा मृत्यू

**सोलापूर** : कपडे धुण्यासाठी गेले असता पाय घसरून पाण्यात बुडाल्याने ८० वर्षीय वृद्ध मयत झाले. ही घटना तळेहिप्परगा येथील मंठाळकर वस्तीत असलेल्या दगडाच्या खाणीत सोमवारी सकाळी उघडकीस आली. इमाम चांदसाब शेख (वय ८० रा. मंठाळकर वस्ती, तळेहिप्परगा असे मयताचे नाव आहे. ते शनिवारी दुपारी घराजवळच्या खाणीत कपडे धुण्यासाठी गेले होते.

त्यावेळी हा प्रकार घडला. ते उशिरापर्यंत घरी न आल्याने घरातील लोकांनी खाणीतील पाण्याजवळ शोध घेतला. काल रविवारी दिवसभर अग्निशामक दल आणि जोडभावी पेठ च्या पोलिसांनी पाण्यात शोध घेतला. मात्र मृतदेह आढळला नव्हता. आज सोमवारी सकाळी त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. मयत इमाम शेख यांच्या पश्चात पत्नी,३ मुले,२ मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांची मुले मजुरी करतात. या घटनेची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. हवालदार दुधाळ पुढील तपास करीत आहेत.

## मैंदर्गीत नगरपरिषद व आरोग्य विभागातर्फे विविध उपक्रम

**अक्कलकोट** : मैंदर्गी नगरपरिषद व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मैंदर्गी शहरात भव्य आरोग्य शिबिर, जनजागृती व माझी वसुंधरा ३.० अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नगर परिषदेच्या सभागृहात योगेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या सहकार्याने आरोग्य विषयक एचआयव्ही, टीबी, गुप्तरोग यांसारख्या आजाराबाबत जनजागृती, उपचार यावर भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मैंदर्गी शहरातील प्रसिद्ध उद्योजक सुरेश नागुर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सुरेश नागुर यांनी मैंदर्गी शहरातील नागरिकांकरिता माझी वसुंधरा ३.० अंतर्गत ७००० लहान व १०० मोठ्या डस्टबिन त्यांच्या वाढदिवसानिमित्त वाटप करणार असल्याचे सांगितले. याशिबीरात दलाल यांनी उपस्थितांना क्षयरोगाबद्दल माहिती दिली. त्यानंतर मैंदर्गी नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजना व त्यापासून संबंधित रुग्णांना मिळणारे उपचार व आर्थिक मदत तसेच एचआयव्ही, क्षयरोग आदी रोगांबाबत विवेचन करताना गुप्तरोगांबाबत मनात कोणतीही शंका न ठेवता तसेच स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता आपल्यासह परिसरातील आपले मित्र नातेवाईक व शेजारी सर्वांनी येऊन मोफत तपासणी करून घ्यावी व या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे उपस्थित नागरिकांना आवाहन केले.

यावेळी पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांना मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्या हस्ते परिचय बोर्डाचे वाटप करण्यात आले.त्यानंतर आठवडे बाजारात आरोग्यासंबंधी जनजागृती करिता पथनाट्य सादर करण्यात आले. दुपारच्या सत्रात आठवडे बाजारात माझी वसुंधरा ३.० अभियानांतर्गत प्लास्टिक बंदीची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत किरकोळ भाजी विक्रेत्यांकडून २२ किलो निर्बंध घातलेल्या कॅरीबॅगची जप्ती करण्यात आली, तसेच ५५०० रुपये दंड वसूल करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी शासनानी बंदी घातलेल्या कॅरीबॅग वापरू नये असे आवाहन केले. सदरच्या मोहिमेत मुख्याधिकाऱ्यांसह कार्यालय अधीक्षक संजय ढमाळ, प्रकाश मनीकडे, नागराज अडाकुल, खाजप्पा दादानुरू, विठ्ठल आरेनरू व नगरपरिषदेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

## कंदलगावात महाशिवरात्रनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे महाशिवरात्र निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. सातव्या अखंड हरिनाम सप्ताहाचे शुभारंभ १२ फेब्रू स.९ वाजता दीप प्रज्वलन, ध्वज पूजन, कलश पूजन, ग्रंथ पूजन, विणा पूजन, मृदंग पूजन, गाथा पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.



ग्रामदैवत श्री केदारेश्वर मंदिर पटांगणात रविवार दिनांक १२ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्र निमित्त ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने सप्ताह कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प सुधाकर इंगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व वारकरी मंडळाचे तालुका अध्यक्ष ह.भ.प संजय महाराज पाटील यांच्या सहकार्याने सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न होणार आहे. सप्ताह दरम्यान,व्यासपीठ व पारायण नेतृत्वाची जबाबदारी ह.भ.प दीपक महाराज भोईटे यांच्याकडे असणार आहे. या सप्ताह कालावधीत ह.भ.प बाबुराव महाराज माने, ह.भ.प डेरे महाराज अंत्रोळीकर, ह.भ.प श्याम महाराज भोसले, ह.भ.प पंकज महाराज गुंड, ह.भ.प संजय महाराज पाटील, ह.भ.प तुकाराम महाराज चिक्कलगी, ह.भ.प सुभद्रा ताई कडते या नामवंत प्रवचन कारांची प्रवचने होणार आहेत.या सप्ताहातील कीर्तन याप्रमाणे,१२ फेब्रु.रोजी ह.भ.प अश्विनी ताई म्हात्रे (मुंबई),१३ फेब्रु.रोजी ह.भ.प मन्मथ महाराज बहिरमल (उळेकर),१४ फेब्रु.ह.भ.प ज्ञानेश्वर तांबे नेवासा,१५ फेब्रु. ह.भ.प किशोरी ताई गिरी (आळंदी), १६ फेब्रु. ह.भ.प रुपाली ताई सवने परतुरकर, १७ फेब्रु.रोजी ह.भ.प कु. संजीवनी ताई गडाख (मनमाड), १८ फेब्रु. •ह.भ.प विलास गेजगे (गंगाखेड) या नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे.

शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी दुपारी बारा ते तीन दरम्यान संदीप मोहिते व अण्णा चव्हाण यांचे जुगलबंदी भारुड होणार आहे. तसेच रात्री ११ ते १२ दरम्यान ग्रामदैवत श्री.केदारेश्वर देवास बिल्वार्चन व रुद्राभिषेक सोहळा होणार आहे. रविवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता ग्रंथ दिंडी, नगरप्रदक्षिणा, सकाळी दहा ते बारा वा. ह.भ.प रमेश महाराज भोर (आळंदी) यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सर्व भक्तांनी या कार्यक्रमाचे लाभ घेण्याचे आवाहन सप्ताह कमिटी व ग्रामस्थांनी केले आहे.



## फडणवीसांना आ.रणजितदादांनी फोन केला अन् तालुक्यात लाईट आली : आ.सातपुते

सुराज्य/अकलूज

थकीत वीज बिला पोटी अनेक तालुक्यातील शेती पंपाचा विज पुरवठा बंद करण्याच्या सूचना वरीष्ठ स्तरावरून आल्यानंतर माळशिरस तालुक्यातील विज पुरवठाही अचानक बंद करण्यात आला.

आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांना याबाबतची माहिती मिळताच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून विज पुरवठा सुरू करण्याबाबत विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ माळशिरस तालुक्यातील विज पुरवठा सुरू करण्याच्या सुचना दिल्या व माळशिरस तालुक्याचा विज पुरवठा सुरू झाला. आ. राम सातपुते यांनी सांगितलेल्या या रहस्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांनी टाळ्या वाजवून आ. रणजितसिंहांचे आभार मानले. माळशिरस तालुक्यातील थकीत वीज बिलाच्या वसुलीसाठी शेतीपंपाची विज तोडण्याच्या पार्श्वभूमीवर आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शिवरत्न बंगला येथे अधिकारी व शेतकऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी यावेळी आ. राम सातपुते, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य धैर्यशील मोहिते-पाटील, दत्तात्रय भिलारे, प्रकाश पाटील, रावसाहेबर पराडे, प्रतापराव पाटील, नितीनराजे निंबाळकर, नाना मुंडफणे, अर्जुनराव भगत, ताटे देशमुख, महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय गायकवाड, उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय ओमासे, प्रविण कुंभार, किरण डोईफोडे, उपव्यवस्थापक प्रदिप सुरवसे यांच्यासह तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.यावेळी ३ एचपी ला तीन हजार तर पाच एच पी ला पाच हजार सरसकट असा बिल भरणा करण्याचे सर्वानुमते ठरले.

## बोधलेवस्तीत गजानन महाराज प्रकटदिन

**मोडनिंब** : अरण येथील बोधलेवस्ती येथे गजानन महाराज प्रकटदिन भक्ती मय कार्यक्रमानी साजरा करण्यात आला. येथील सदाशिव अंबादास सावंत आप्पा यांच्या निवासस्थानी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गजानन महाराज यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून भजन, किर्तन व फुले टाकण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रारंभी हभप बंडोपंत कोरे महाराज देगावकर यांचे किर्तन संपन्न झाले. हनुमंत जाधव, शिवाजी सावंत, धनाजी सावंत, सावता सावंत, राजाभाऊ इंगळे, यांनी गायन केले.

## वेळापूर इंग्लिश स्कूलमध्ये १९९७-९८ बॅचचा मेळावा

**वेळापूर** : इंग्लिश स्कूल वेळापूर तालुका माळशिरस येथील सन १९९७-९८ च्या इयत्ता दहावीच्या बॅचचा स्नेह मेळावा नुकताच उत्साहात संपन्न झाला. तब्बल पंचवीस वर्षानंतर एकत्र आलेले तत्कालीन शालेय मित्र जुन्या शिक्षकांच्या आठवणीमध्ये चांगलेच रमले.




यावेळी सवंगड्यांसोबत विविध फनी गेम्स जेवणाचा आस्वाद घेण्यात आला. या स्नेह मेळाव्यासाठी त्यावेळीचे मुख्याध्यापक हनुमंत मेलगे, शिक्षक रामचंद्र पाचपुंड, ए.के. गोठणे, बी एस बनसोडे, प्रतापराव पाटील, विद्यमान मुख्याध्यापक रमेश पवार, खाजगी शिकवणी घेणारे सदुभाऊ शिंदे, ईलाही शेख उपस्थित होते. यावेळी ॲड रामचंद्र ताटे, मयूर पाटील, डॉ. झकीया मुलाणी, विजया वाघे, उर्मिला लोहार, सीमा सुरवसे, माधुरी माने, शबाना कोरबु, वैशाली कारंडे, शोभा लोखंडे, रईसा तांबोळी, दिपाली देशमुख यांनी मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळाला दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. स्वप्नील नागटिळक, ॲड. रामचंद्र ताटे, मयूर पाटील, नवनाथ जाधव, अनिल जाधव, अतुल जवंजाळ, आनंद मांडवे, गणेश कुलकर्णी, यतिराज झगडे यांनी परिश्रम घेतले.

## आयसीसी ग्लोबल इव्हेंट्सची भागीदारी

**सोलापूर** : पॉलीकॅब इंडिया लि.या भारतातील आघाडीच्या आणि १२२+ अब्ज रुपयांची एकत्रित उलाढाल असलेल्या इलेक्ट्रिकल गुड्स कंपनीने आज आर्थिक वर्ष २२ साठी इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिलसह अधिकृत भागिदारी केल्याचे जाहीर केले.या भागिदारी अंतर्गत पॉलीकॅब्द्वारे २०२३ च्या अखेरपर्यंत जागतिक पातळीवरील महिला व पुरुषांच्या सर्व आयसीसी कार्यक्रमांसाठी प्रायोजकत्व दिले जाणार आहे.

POLYCAB
WIRES & CABLES

सुराज्य Classified

**नोकरी विषयक**

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१३०३२३)

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (030323)

# बार्शी येथे लायन्स इंटरनॅशनलची विभागीय परिषद उत्साहात

## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

सुराज्य/बार्शी

लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ ड १ विभाग १ ची विभागीय परिषद बार्शी येथे संपन्न झाली या विभागीय परिषदेत प्रमुख पाहुणे प्रांतपाल राजशेखर कापसे प्रमुख उपस्थिती आमदार राजेंद्र राऊत तर प्रमुख वक्ते म्हणून शिवव्याख्याते शिवरत्न शेटे हे होते बार्शी येथे आर के क्लब अँड रिसॉर्ट या निसर्गरम्य ठिकाणी ही कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर प्रथम उपप्रांतपाल भोजराज नाईक निंबाळकर, द्वितीय उपप्रांतपाल डॉ..एम.के पाटील, लायन्स इंटरनॅशनल चे रिजन चेअरमन बापूसाहेब कदम, रिजन सेक्रेटरी विकास जाधव कॉन्फरन्स चेअरमन अक्षय बंडेवार होम क्लबचे अध्यक्ष सुभाष भोसले वैशालीताई कापसे जयश्रीताई कदम हे उपस्थित होते.

या कॉन्फरन्स साठी माजी प्रांतपाल अशोकभाई मेहता माजी प्रांतपाल व्यंकटेश यजुर्वेदी माजी प्रांतपाल प्रबुद्धचंद झपके माजी प्रांतपाल जगदीश पुरोहित माजी प्रांतपाल जितेंद्र माढेकर माजी प्रांतपाल अरविंद कौनशिरसगी प्रांतीय सचिव सुभाष गडसिंग प्रांतीय खजिनदार मल्लिकार्जुन मसुती तसेच राजेंद्र कांसवा, वीरेंद्र चिखले, राहुल माढेकर, अतुल सोनिग्रा, डॉ.शरद पाटील यांच्यासह उप विभागीय सभापती गोविंद मंत्री, राजिव कटेकर ,असिफ इक्बाल, शैलेश कोरवार,सह इतर प्रांतीय पदाधिकारी उपस्थित होते.




यावेळी सोलापूर जिल्ह्यातील अनेक क्लब ने बॅनर प्रेजेंटेशन, लायन क्विज, प्रेसिडेंट स्पीच या स्पर्धांमध्ये भाग घेतला चालू वर्षात ज्या क्लब ने उत्कृष्ट सेवा कार्य केले ज्या लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी उत्कृष्ट काम केले अशा पदाधिकाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अशा पाच मान्यवरांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गिरीश शेटे प्रशांत पंडित राणाप्रताप देशमुख ड दिनेश श्रीश्रीमाळ भगवंत पोळ बालकिशन जाजू लखन राजपूत ओंकार शहाणे रवींद्र कसपटे अनमोल तारे निखिल गोदने गोविंद तापडिया नितीन कौलवार संदिप नागणे वर्षा साखरे,पुनम लड्डा अश्विनी जाधव, दिपा भडुळे ,रेश्मा चाटी ,श्रध्दा कोत्तावार, वृषाली होनराव, उमा भोसले, या सदस्यांनी परिश्रम घेतले

**या कॉन्फरन्समध्ये बार्शी शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत राहुन समाजाप्रती विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांचा लायन समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये वैद्यकीय क्षेत्र डॉ.शितल बोपलकर, शैक्षणिक क्षेत्र संभाजी घाडगे, पत्रकारिता क्षेत्र भ.के.उर्फ नाना गव्हार्णे सामाजिक क्षेत्र मातृभूमी प्रतिष्ठान संतोष ठोंबरे, क्रीडाक्षेत्र वेदश्री बंडेवार**

# आत्मनिर्भर भारताची ताकद दिसणार

सुराज्य/बंगळुरु

**गेल्या दशकभरापासून भारतानं आधुनिक तंत्रज्ञान वापरून देशातच शस्त्रनिर्मितीला प्रोत्साहन दिलं आहे. कधी काळी अमेरिका, रशिया आणि चीनसह जगातील सर्व बलाढ्य देशांना त्यांच्याकडे असलेल्या अत्याधुनिक पद्धतीची शस्त्रे बनवण्याचे तंत्रज्ञान असल्याचा अभिमान होता आणि शस्त्रनिर्मितीमध्ये त्यांच्या वर्चस्वाला कोणीही आव्हान देऊ शकत नसल्याचा विश्वास होता. मात्र, गेल्या दशकात भारताने त्या बलाढ्य देशांना केवळ आव्हानच दिले नाही, तर अशी स्वदेशी परिसंस्था निर्माण केली, ज्यामुळे भारत आता शस्त्रनिर्मितीच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. यासोबतच जगातील सर्व लहान देश ज्यांचे संरक्षण बजेट कमी आहे आणि ते महागडी शस्त्रे किंवा प्लॅटफॉर्म खरेदी करू शकत नाहीत, त्यांच्या आशाही भारताकडून वाढल्या आहेत.**



आता बंगळुरूमध्ये सोमवारपासून सुरू झालेल्या एरो इंडिया २०२३ शोमध्ये भारताची स्वदेशी शक्ती दिसेल. दोन वर्षांतून एकदा होणाऱ्या या एरो इंडियामध्ये भारत आपली स्वदेशी लढाऊ विमाने, युटिलिटी हेलिकॉप्टर, अटॅक हेलिकॉप्टर, ड्रोन आणि क्षेपणास्त्रे जगासमोर दाखवणार आहे. या एरो इंडियामध्ये ३२ देशांचे संरक्षण मंत्री डिफेन्स मिनिस्टर कॉन्क्लेव्हमध्ये सहभागी होत आहेत, तर २९ देशांचे हवाई दल प्रमुख सहभागी होणार आहेत. एरो इंडियाबाबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, 'संरक्षणमंत्र्यांसोबत बैठकीसाठी माझे नाव देण्यात आलेय. ते मित्र देशांसोबतच्या आव्हानांना सामोरे जाण्यास गती देतील आणि संरक्षण क्षेत्रात आम्ही सायबर, आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह उत्पादन क्षेत्रात नवीन स्थान प्राप्त करू.'

**एरो इंडियासाठी ८०० हून अधिक कंपन्यांची नोंदणी**

एरो इंडियासाठी भारतातील आणि परदेशातील ८०० हून अधिक कंपन्यांनी आपली नोंदणी केली आहे, यात ते त्यांची छोटी ते मोठी उत्पादने प्रदर्शित करणार आहेत. १३ ते १७ फेब्रुवारी दरम्यान चालणाऱ्या एरो इंडियाचे पहिले ३ दिवस बिझनेस डे म्हणून ठेवण्यात आलेत आणि उर्वरित २ दिवस सर्वसामान्यांसाठी असतील, तेव्हा ते हा एरो शो पाहू शकतील. यावेळी विशेष फ्लाय-पास्टचे आयोजन केले जाईल, ज्यामध्ये हवाई दल, एचएएल, डीआरडीओ, भारतीय नौदल आणि लष्कराचे लढाऊ विमान, हेलिकॉप्टर आणि ड्रोन भाग घेतील. मेड इन इंडिया, मेड फॉर द वर्ल्ड' म्हणजेच भारताने जगासाठी बनवलेले विमान आणि शस्त्रे ही या एरो शोची थीमही ठेवण्यात आली आहे, या 'एरो-इंडियाची टॅगलाइन रनवे टू अ बिलियन अपॉर्च्युनिटी' अशी आहे.

**दोन खास ड्रोन आकाशात दिसणार**

या एरो शोमध्ये हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) च्या वतीने स्वदेशी विमाने आणि हेलिकॉप्टरसह दोन विशेष DRDO ड्रोनदेखील आकाशात दिसणार आहेत. यापैकी एक ड्रोन तपस आहे आणि दुसरा 'ड्रोन आर्चर' आहे. फ्लायपास्टदरम्यान डीआरडीओचे 'ड्रोन तापस' अधिक उंचीवर उड्डाण करणारे ड्रोन फक्त सर्व काही रेकॉर्ड करणार नाही, तर त्यातून थेट फीडदेखील दाखवले जाणार आहे. याशिवाय या एरो शोमध्ये डीआरडीओने बनवलेले सशस्त्र किंवा अटॅक ड्रोन पहिल्यांदाच जगासमोर येणार आहेत.

**हेलिकॉप्टर निर्मितीमध्ये भारताची प्रगती**

या एरो शोदरम्यान स्वदेशी स्वयंपूर्ण उड्डाण निर्मिती फ्लाय पास्टमध्ये ठळकपणे पाहायला मिळणार आहे. या निर्मितीमध्ये LCH-प्रचंड, ALH ध्रुव आणि लाइट युटिलिटी हेलिकॉप्टरसह १५ स्वदेशी हेलिकॉप्टर ज्यांचा कारखाना नुकताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला समर्पित केलाय, यांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय फिक्स्ड-विंग एअरक्राफ्टमध्ये एलसीए-ट्रेनर, एचटीटी-४०, आयजेटी आणि हॉक-आय यांचा समावेश असेल. तसेच भारतीय हवाई दलाचे राफेल, सुखोई, एलसीए तेजस, मिराज २००० आणि मिग-२९ हे विमानही फ्लाय पास्टमध्ये सहभागी होणार आहेत. लष्करी वाहतूक विमाने, C-17 आणि C-130 सह टोही विमाने देखील सहभागी होतील. एरो इंडियादरम्यान देशातील पहिल्या सुपरसॉनिक कॉम्बॅट ट्रेनर विमानाचे डिझाईन जगाला दिसणार आहे.

या दरम्यान DRDO द्वारे एकूण ३३० उत्पादने आणि तंत्रज्ञान प्रदर्शित केले जातील, ज्यात Astra, लाँग रेंज सरफेस टू एअर मिसाइल (LRSAM), क्विक रिॲक्शन सरफेस टू एअर मिसाइल (QRSAM), SAM, नेक्स्ट जनरेशन अँटी रेडिएशन मिसाइल, स्मार्ट अँटी देअर यांचा समावेश आहे.

एअरफील्ड शस्त्रे आणि निर्भय क्षेपणास्त्रेही असतील. एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम, एलसीए तेजस आणि एलसीए नेव्ही डीआरडीओच्या फ्लाइंग डिस्प्लेमध्ये सहभागी होतील. मात्र, संपूर्ण देशाच्या नजरा आशियातील सर्वात मोठ्या एअर शो एरो इंडियाकडे लागल्या असून, तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारताचा पराक्रम जगाला दिसेल, अशा पद्धतीने हा शो सादर केला जाणार आहे.

# लिलावात ८७ खेळाडूंवर ५९.५० कोटींची बोली

## भारताची स्मृती ठरली महागडी

सुराज्य/मुंबई




महिला प्रीमिअर लीगसाठी मुंबईत खेळाडूंचा लिलाव सुरू झाला आहे. जिओ वर्ल्ड वर्ल्ड कंवेशन सेंटर येथे महिला आयपीएलच्या पहिल्या हंगामासाठी या लिलावाला सुरुवात झाली. लिलावातील पहिलीच बोली भारतीय संघातील सलामीवीर आणि उपकर्णधार स्मृती मानधनावर लावण्यात आली. तिची बेस प्राइस ५० लाख होती आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने स्मृतीला ३ कोटी ४० लाखांना संघात घेतले.

# टीम इंडियाची कॅप्टन आता मुंबई इंडियन्समधून खेळणार

सुराज्य/मुंबई

भारतीय संघाची दमदार कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्यावर स्मृती मानधनानंतर बोली लावण्यात आली. टीम इंडियाची कर्णधार हरमनप्रीत कौरवर सुद्धा कोटींची बोली लावली गेली. भारतीय कर्णधाराला लिलावात १.८० कोटी रुपयांना विकत घेण्यात आले आहे. हरमन ही टी-२० क्रिकेटमधील दिग्गज खेळाडूंपैकी एक आहे. तिची मूळ किंमत ५० लाख रुपये होती.

हरमनप्रीत वीमेन्स प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्स या संघाकडून खेळणार आहे. मुंबईने कौरला १.८० कोटी रुपयांना विकत घेतले. हरमनप्रीतसाठी बोली लावण्याची मोठी फेरी झाली, पण शेवटी मुंबई इंडियन्सला संधी मिळाली.

कौरला १४७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. यामध्ये हरमनने १०७ च्या स्ट्राईक रेटने आणि २८ च्या सरासरीने २९५६ धावा केल्या आहेत. याशिवाय गोलंदाजीतही तिच्या नावावर ३२ विकेट आहेत. हरमनप्रीत कौर ही मधल्या फळीतील विस्फोटक फलंदाज आहे. या कारणास्तव, तिला खरेदी करण्याची बोली बराच काळ चालू होती.

आरसीबीने तिला खरेदी करण्यासाठी पहिली बोली लावली. यानंतर दिल्ली कॅपिटल्सनेही सहभाग घेतला.




# भारतासह तीन देशांना तुर्कीच्या संशोधकांचा इशारा

सुराज्य/नवी दिल्ली

टर्कीमध्ये महाप्रलयकारी भूकंपाने जगाला मोठा हादरा बसला आहे. या भूकंपात आतापर्यंत ३३ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

या भूकंपाच्या तीन दिवस आधी नेदरलँडमधील एका संशोधकाने महाप्रलयकारी भूकंपाचा अंदाज वर्तवला होता. डच रिसर्चर फ्रँक हूगरबीट्स यांनी आता भारतासह, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या आसपासच्या प्रदेशात भूकंपाचे मोठं धक्के बसतील असा अंदाज वर्तवला आहे.

फ्रँक हूगरबीट्स यांनी टर्कीमध्ये ७.५ मॅग्निट्युड क्षमतेच्या भूकंपाचा अंदाज वर्तवला होता. परंतु त्यांना कोणी फारसं गांभीर्याने घेतलं नाही. तीन दिवसांनी टर्की आणि सीरियात विध्वंसकारी भूकंप आल्यानंतर सर्वांना हूगरबीट्स यांची आठवण झाली. हूगरबीट्स यांनी सांगितलं की, ते ग्रहांच्या हालचालींच्या आधारावर भूकंपाची भविष्यवाणी करतात. तसेच ते सोलार सिस्टिम ज्योमेट्री सर्वे साठी (SSGEOS) काम करत आहेत. SSGEOS ही एक संशोधन संस्था आहे जी भूकंपाबद्दलची माहिती घेण्यासाठी खगोलीय वस्तूंचे निरीक्षण करते.

फ्रँक म्हणाले की, 'मी टर्कीतल्या भूकंपाचा अंदाज वर्तवू शकलो कारण मी त्यावर बरंच संशोधन केलं आहे. भूकंपासंबंधी गोष्टी घडतील, असा अंदाज वर्तवला होता. परंतु तीन दिवसांनी भूकंप येईल हे मला माहिती नव्हतं.

**२००१ सारखा भूकंप येण्याची शक्यता?**

आता फ्रँक यांनी अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारतासह हिंद महासागरात मोठ्या भूकंपाची भविष्यवाणी केली आहे. फ्रँक म्हणाले की, 'या भूकंपाबद्दल थोडा संभ्रम आहे.

कारण अजून एक गोष्ट स्पष्ट झालेली नाही की, भूकंप अफगाणिस्तानपासून सुरू होऊन हिंदी महासागरापर्यंत जाईल. २००१ प्रमाणे भारतावर या भूकंपाचा परिणाम होईल असं वाटतंय, परंतु त्याबद्दल ठोस माहिती नाही.

# कोयता गँगमधील दोघांच्या मुसक्या आवळल्या

सुराज्य/पुणे

हडपसर भागात दहशत माजविणाऱ्या कोयता गँगमधील दोघांना पोलिसांनी शिरूर तालुक्यातील पाबळ गावात पकडले.

पोलिसांना पाहताच उसाच्या फडातून पसार झालेल्या दोघांना पाठलाग करुन पोलिसांनी ताब्यात घेतले. कोयता गँगमधील आणखी एकाला नगर जिल्ह्यातील पाथर्डी परिसरातून अटक केली.

# आईवरील अत्याचाराचा सूड घेतला

## युपीएससी करणाऱ्याने दाम्पत्याला संपवले

सुराज्य/पिंपरी

सहा वर्षांपूर्वी आईवर घडलेल्या अत्याचाराच्या घटनेचा बदला घेण्यासाठी ३२ वर्षीय मुलाने टोकाचं पाऊल गाठलं. यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाने पिंपरी चिंचवड येथील दापोडी परिसरात राहणाऱ्या काटे दाम्पत्याचा डोक्यात फावडे घालून खून केल्याची घटना समोर आली आहे. आरोपी घेण्यासाठी दिल्लीहून थेट पुण्यात आला होता. खून केल्यानंतर हातात फावडे घेऊन रक्ताने माखलेल्या अवस्थेत पोलीस स्टेशनला हजर होण्यासाठी निघाला होता. स्वतःसोबत घडलेली आपबिती पोलिसांना सांगितली आणि या हत्येचा उलगडा झाला.

मारुती उर्फ शंकर नारायण काटे (वय ६० वर्षे), संगीता मारुती काटे (वय ४६ वर्षे, दोघे रा. दापोडी) अशी खून झालेल्या पती-पत्नीची नावे आहेत. प्रसन्ना प्रमोदराव मंगरूळकर (वय ३२ वर्ष, रा. खेड मक्ता, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर) असे आरोपीचे नाव आहे. प्रकरणी शगुन रघुनाथ काटे (वय २६ वर्ष, रा. दापोडी गावठाण) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# कंगाल पाककडून भूकंपग्रस्तांना २४८ कोटी

सुराज्य/पिंपरी

पाकिस्तानमधील एका अज्ञात व्यक्तीने टर्की आणि सीरीया देशातील भूकंपग्रस्तांसाठी ३० मिलियन डॉलर अर्थात २४८ कोटी रुपये दान केले आहेत. मागील काही काळापासून पाकिस्तान आर्थिक समस्यांचा सामना करत आहेत. प्रचंड महागाई वाढल्याने तेथील जनता हवालदिल झाली आहे.

सरकारच्या तिजोरीतही खडखडाट आहे. त्यामुळे पाकिस्तान आर्थिक मदतीसाठी परकीय देशांकडे मदत मागत आहे. अशी एकंदरीत स्थिती असताना पाकिस्तानमधील एका अज्ञात व्यक्तीने टर्की आणि सीरीया देशातील भूकंपग्रस्तांसाठी ३० मिलियन डॉलर अर्थात २४८ कोटी रुपये दान केले आहेत.

# थोरातांचा राजीनामा नामंजूर; श्रेष्ठींची घेणार भेट

सुराज्य/मुंबई



नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षांवर नाराज असलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात लवकरच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेणार आहेत. काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी एच. के. पाटील यांच्या भेटीनंतर बाळासाहेब थोरात यांनी यासंदर्भातील निर्णय घेतला आहे. दरम्यान, थोरात यांचा विधिमंडळातील पक्षनेतेपदाचा राजीनामा स्वीकारला नसल्याचे एच. के. पाटील यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आणि मुंबई काँग्रेसच्या हाथ से हाथ जोडो' अभियानाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी एच. के. पाटील रविवारी मुंबई दौऱ्यावर होते. त्यानिमित्त त्यांनी बाळासाहेब थोरात यांची वरळी येथील निवासस्थानी भेट घेतली. त्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी हा खुलासा केला. थोरात यांचा राजीनामा स्वीकारण्याचा प्रश्नच येत नाही. काही गैरसमज असतील, तर ते सोडविले जातील. ते पक्षश्रेष्ठींशी बोलले आहेत. त्या पातळीवर प्रश्न सोडविले जातील. लवकरच थोरात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खर्गे यांना भेटून आपली भूमिका स्पष्ट करतील,' असे त्यांनी यावेळी सांगितले.

# नवीकोरी डबल डेकर एसी बस मुंबईकरांच्या सेवेत

सुराज्य/मुंबई




देशातील पहिली एसी डबल डेकर बस मुंबईच्या रस्त्यांवर आता धावणार आहे. ही बस पुण्यातील ऑटोमोटिव रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाकडून (ARAI) फिटनेस सर्टिफिकेट मिळालं आहे. स्विच नावाच्या कंपनीकडून ही बस तयार करण्यात आली आहे.

२०२२ मध्ये ऑगस्ट महिन्यातच ही बस आली होती. मात्र बस प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्याआधी याला ARAI कडून मंजुरी मिळणं गरजेचं होतं. ही बस रविवारी संध्याकाळी मुंबईत पोहोचली. ही बस आठवड्याभरात सुरू होईल. हैदराबाद येथील स्विच कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, बस २०२२ मध्ये तयार असली, तरी तिला ARAI कडून मंजुरी मिळाली नव्हती. आता याला मंजुरी देण्यात आली आहे. आता पहिल्या टप्प्यात लवकरच दहा बसेस मुंबईत पाठवल्या जातील.

बसची ऑपरेशनल क्षमता १८० किमीपर्यंत असणे अपेक्षित आहे. रस्त्यांची गुणवत्ता, ट्रॅफिक आणि हवामान यासारखे अनेक घटक यासाठी विचारात घेतले जातात. ४५ मिनिटांच्या चार्जिंगमध्ये बस १०० किमीपर्यंत धावू शकते, तर संपूर्ण चार्जसाठी ८० मिनिटं लागतात. या बसची बॉड ॲल्युमिनिअमपासून बनलेली आहे. या एका बसची किंमत जवळपास २ कोटी रुपये आहे. यातून जवळपास ८० प्रवासी प्रवास करू शकतात.



# अदानींचे शेअर्स ७० टक्क्यांपर्यंत गडगडले

सुराज्य/नवी दिल्ली

हिंडेनबर्ग रिपोर्ट आल्यानंतर अदानींच्या शेअर्सला घरघर लागली आहे. ती अद्यापही काही थांबण्याचं नाव घेत नाही आहे.

अदानींच्या कंपन्यांसंदर्भातला हिंडेनबर्ग रिपोर्ट २४ जानेवारी २०२३ रोजी समोर आला, त्यानंतर अदानी समूहाच्या शेअर्समध्ये ७० टक्क्यांपर्यंत घसरण झाल्याचं नोंदवण्यात आलं आहे. सर्वाधिक घसरण ही अदानी टोटल गॅसच्या शेअर्समध्ये पाहायला मिळतेय. अदानी ग्रुपचे सर्व शेअर्स सोमवारी मोठ्या घसरणीसह व्यवसाय करीत आहेत. तसेच अदानी समूहाचे शेअर्सही ५ टक्क्यांच्या लोअर सर्किटवर आहेत.

गेल्या आठवड्याच्या शेवटच्या व्यापार सत्रातही अदानी समूहाचे अदानी पॉवर, अदानी ट्रान्समिशन, अदानी ग्रीन आणि अदानी टोटलचे शेअर्स घसरणीसह बंद झाले होते.

विशेष म्हणजे ही घसरण आजही पाहायला मिळत आहे.

# बँकेची ४०९ कोटींची फसवणूक

## आमदार रत्नाकर गुट्टेंसह कुटुंबीयांवर सीबीआयकडून गुन्हा

सुराज्य/नवी दिल्ली

**सीबीआयने परभणीतील गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून रासपचे आमदार आणि साखर उद्योगपती रत्नाकर गुट्टे आणि गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेड यांच्या विरोधात ४०९.२६ कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणुकीप्रकरणी एफआयआर दाखल केला आहे. याशिवाय गुट्टेंचा मुलगा आणि कुटुंबातील काही सदस्यांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

रत्नाकर गुट्टे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत परभणीतील गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढून जिंकली आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, रत्नाकर गुट्टे हे गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेडच्या संचालकांपैकी एक आहेत.

युको बँकेच्या नेतृत्वाखालील बँक संघटनांकडून २००८ आणि २०१५ च्या दरम्यान गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेडने मुदत कर्ज, वर्किंग कॅपिटल सुविधा आणि इतर क्रेडिट सुविधांच्या रुपात ५७७.१६ कोटी रुपयांच्या विविध कर्ज सेवा घेतल्याचा आरोप असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

सीबीआयने नुकतीच नागपुरात दोन, तर परभणीत तीन ठिकाणी गुट्टे आणि इतर आरोपींच्या घरांची झडती घेतली. गुट्टे यांच्या मुलांवर आणि कुटुंबातील इतर सदस्यांवरही



भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदीनुसार गुन्हेगारी कट रचणे आणि फसवणूक केल्याच्या आरोपाखाली सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे.

अंमलबजावणी संचालनालयाने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये रत्नाकर गुट्टे आणि गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेड यांच्याविरुद्ध कथित मनी लाँड्रिंगप्रकरणी आरोपपत्र दाखल केले होते. बँकेने तक्रारीत केलेला आरोप आता सीबीआयच्या एफआयआरचा भाग आहे.

कंपनीसाठी रोख रकमेचा तुटवडा निर्माण झाला, व्यवसायात नुकसान झाले आणि शेवटी बँकांना थकबाकी न भरल्याने कंपनीचे खाते नॉन-परफॉर्मिंग ॲसेट बनले. कंपनीने २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत साखरेच्या खरेदी-विक्रीसाठी पुरवठादारांच्या नावे युको बँक आणि युनियन बँक ऑफ इंडियाकडून लेटर ऑफ क्रेडिट (एलसी) उघडले, ज्याची रक्कम १९७.१७ कोटी रुपये इतकी होती, असा बँकेचा आरोप आहे.

एलसी अंतर्गत माल नाकारण्यात आला आणि १४३.८७ कोटी रुपयांचा खरेदी परतावा म्हणून दाखवण्यात आला, असा दावाही बँकेतर्फे करण्यात आला आहे.



## आढीवच्या खो-खो स्पर्धेत वेळापूरचा अर्धनारी नटेश्वर क्रीडामंडळ विजेता

**वेळापूर** : आढीव तालुका पंढरपूर येथे कै.वसंतराव काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त घेण्यात आलेल्या खो खो स्पर्धेत वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर क्रिडा मंडळाच्या खोखो खेळाडूंनी घवघवीत यश मिळवले आहे. खो-खो स्पर्धेचा अंतिम सामना अर्धनारी नटेश्वर क्रिडा मंडळ वेळापूर व किरण स्पोर्ट्स क्लब सोलापूर यांच्यामध्ये होऊन वेळापूर खो खो संघाने एकतर्फी सामना जिंकून रोख रक्कम आकरा हजार रुपये व स्मृतिचिन्ह मिळवले तसेच या सामन्यामध्ये बेस्ट टूर्नामेंट प्लेअर म्हणून रामजी कश्यप, गणेश बोरकर, समीर शेख यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या विद्यार्थांना राष्ट्रीय पंच सोमनाथ बनसोडे व भरत अवार्ड विजेता जावेद आतार यांचे मार्गदर्शन लाभले.

## सोलापूर राष्ट्रीय समाज पक्षाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन

**सोलापूर** : शेतकऱ्यांचे थकीत वीज बिल संपूर्ण माफ करा, शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा १२ तास वीज द्या, शेतकऱ्यांना शेतीसाठी मोफत वीज द्या अशा विविध मागणीसाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अशोक ढोणे यांच्या उपस्थितीत सोमवारी जिल्हाधिकारी मिलिंद शिंदे यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील शेतकरी सध्या फारच अडचणीत आहे परंतु महावितरणने राज्यातील शेतकऱ्यांचे शेतीचे वीज कनेक्शन कट केले आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे थकीत वीज बिल माफ करून वेज पुरवठा सुरळीत करा अशी मागणी करण्यात आली. अन्यथा राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांना घेऊन तहसील कार्यालय, उपविभागी कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी कार्यालय आणि महाविद्यालयांच्या कार्यालयासमोर मोर्चा काढू असा इशाराही देण्यात आला. यावेळी अपर्णा श्रीनिवास, कोंडा बत्तीनी, सतीश बुजने, अक्षय हक्के यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन त्वरित जोडा; क्रांतीवीर किसान सेनेचे निवेदन

**सोलापूर** : शेतकऱ्यांची वीज कनेक्शन त्वरित जोडा या मागणीचे निवेदन क्रांतिवीर किसान सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना देण्यात आले. निवेदनात असे म्हटले आहे की, शेतकरी गेल्या चार ते पाच वर्षापासून कोरोना तसेच अतिवृष्टी या संकटामुळे हवालदिल झाला आहे. त्याच्या कृषी मालाला हमीभाव न मिळाल्याने व शेती खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यामुळे तसेच नफा कमी झाल्यामुळे व साखर कारखान्यामध्ये वेळेत बिल न दिल्यामुळे शेतकरी खूप मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. उन्हाळ्यात शेतीपंपाचे वीज बिल वसुलीसाठी कोणतेही पूर्वकल्पना न देता शासन महावितरणच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचे वीज कनेक्शन तोडत आहे. तरी गंभीर प्रकाराकडे लक्ष देऊन त्वरित एकही रुपया न घेता शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन पूर्ववत जोडून द्यावे. अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशाराही देण्यात आला. यावेळी विशाल पाटील, करण राजे गडदे, जयदेव सुरवसे, जीडी पांढरे ,अक्षय हक्के आदी उपस्थित होते.

## हेमंत कुलकर्णी यांना उर्दू मित्र पुरस्कार तर अब्दुल शेख यांना साहित्यिक पुरस्कार

**सोलापूर** : सोलापूर अखिल भारतीय उर्दू साहित्य संमेलन समिती सोलापूरच्या वतीने दरवर्षी उर्दू दिनानिमित्त मराठी भाषेतून उर्दू भाषा अवगत असणाऱ्या व उर्दू भाषेवर प्रेम करणाऱ्या एका मान्यवरांचा उर्दू मित्र म्हणून तर उर्दू साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात उर्दू भाषेच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या योगदानासाठी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते अशी माहिती अखिल भारतीय उर्दू साहित्य संमेलनाचे ॲड.यु एन बेरिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पुरस्काराचे वितरण बुधवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ रोजी महापालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधव वर महापालिकेचे उपायुक्त संदीप कारंजे यांच्या उपस्थितीत सायंकाळी साडेसहा वाजता कॉ एन बेरिया शैक्षणिक संकुल लष्कर येथे आयोजित करण्यात आला आहे. संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र सन्मानचिन्ह शाल श्रीफळ तसेच प्रत्येकी ५००० रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती बेरिया यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली यावेळी विकार शेख रियाज बळसंकर महंमद हुसेन बक्षी नासिर आळंदकर आदींची यावेळी उपस्थित होते.

## शासनमान्य ग्रंथपालन वर्ग प्रवेशासाठी आवाहन

**सोलापूर** : जिल्हा ग्रंथालय संघ व पुणे विभाग ग्रंथालय संघामार्फत चालविल्या जाणाऱ्या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे वर्ग चालविण्यात येणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यालय हुतात्मा स्मारक, मार्कंडेय उद्यान, अशोक चौक, पोलीस चौकी समोर, सोलापूर येथे ३१ मार्च पर्यंत संपर्क साधावा.दररोज दुपारी १२ ते ५ पर्यंत प्रवेश अर्जाचे फॉर्म कार्यालयात उपलब्ध आहेत. प्रशिक्षणार्थी किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण असावा. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील सेवकांना प्राधान्याने प्रवेश दिला जाईल. इतर उमेदवारांसाठी १०वीचे गुण हेच प्रमुख निकष असतील. हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय, सार्वजनिक वाचनालय, हॉस्पिटल येथे ग्रंथपाल म्हणून काम करण्यासाठी हा कोर्स आवश्यक आहे. डी. एड. समकक्ष हा कोर्स आहे.

# अवंती नगर येथील रेल्वे बोगद्याच्या कामासाठी डीआरएम यांनी पाठविला मुंबईला प्रस्ताव

### बोगद्याचे काम झाल्यानंतर ५४ मीटर रस्त्याचा मार्ग होणार मोकळा; मनपा आयुक्तांच्या पाठपुराव्याला अखेर यश

**सोलापूर** : अवंती नगर येथील रेल्वे बोगद्याचे काम करण्यासाठी सोलापूरचे डीआरएम यांनी फायनल शट डाऊन डिझाईन प्रस्तावही मुंबई स्तरावर पाठविला आहे. यामुळे हे काम लवकरच मार्गी लागणार आहे. बोगद्याचे काम झाल्यानंतर ५४ मीटर रस्त्याचा मार्ग मोकळा होणार असल्याची माहिती आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

जुना पुना नाका ते सीएनएस हॉस्पिटल दरम्यानच्या ५४ मीटर रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडले आहे. या दरम्यान रेल्वे लाईन असल्याने रेल्वे बोगदा तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सोलापूर महापालिका प्रशासनाने सन २०१८ मध्ये १८ कोटी रुपये रेल्वे प्रशासनाकडे भरले होते. त्यानंतर रेल्वे प्रशासनाकडून हे काम करण्यात आले नाही. दरम्यान महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी यासंदर्भात सातत्याने सोलापूरचे डीआरएम यांच्याशी पाठपुरावा केला. त्याला अखेर यश आले आहे. डीआरएम यांनी रेल्वे बोगदा



करण्यासाठी शट डाऊन घेण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता फायनल डिझाइन प्रस्तावही मुंबईला वरिष्ठ स्तरावर पाठविला आहे. यामुळे लवकरच हे काम मार्गी लागेल असे सोलापूरचे डीआरएम यांनी स्पष्ट केले आहे, अशी माहिती आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली. यामुळे आता या ५४ मीटर रस्त्याचे काम या बोगद्याच्या कामानंतर मार्गी लागणार आहे. जुना पुना नाका जवळील हांडे प्लॉट येथील काही घरेही संबंधितांनी स्वतःहून काढून घेतली आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील अतिक्रमण अडथळाही आता दूर झाला आहे. बोगद्याचे काम संपल्यानंतर या ५४ मीटर रस्त्याचे काम मार्गी लागेल.

### रस्त्यावर साईड पट्टी मारण्याच्या सूचना

शहरात १७ नवे रस्ते करण्यात आले आहेत. या रस्त्यांवर अद्यापही सेंटर आणि साईड पट्ट्या करण्यात आल्या नाहीत. या पट्ट्याचे काम तातडीने करण्याचे आदेश संबंधितांना दिले आहेत, असेही महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी यावेळी सांगितले.

### स्मशानभूमींची कामे मार्चअखेर पूर्ण होतील

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरातील १४ स्मशानभूमीची कामे हाती घेण्यात आली आहेत. विद्युत दाहिनीसह या अंतर्गत सर्व कामे येत्या मार्च अखेरपर्यंत पूर्ण करून ती महापालिकेकडे हस्तांतरित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या अंतर्गत असलेली सर्व कामे वेळेत पूर्ण होतील, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

### स्काडाअंतर्गत चार कामे पूर्ण

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत व्हावा या उद्देशातून अत्याधुनिक अशी स्काडा प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत तीन ते चार कामे पूर्ण झाले आहेत. दरम्यान हे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी व्यक्त केली.

## दोन आमदारांनी सांगूनही कुर्डूवाडीतील ९१७ मालमत्ता प्रकरणे जैसे थे!

**सुराज्य/कुर्डूवाडी**

कुर्डुवाडी येथील ९१७ मालमत्ताधारकांची अतिक्रमणे १५ दिवसांच्या नियमानुकुल करण्यासंबंधी आमदार बबनदादा शिंदे व आमदार संजयमामा शिंदे यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनेला १५ दिवस होऊनही मालमत्ता धारकांचा प्रश्न अजून जैसे थे प्रलंबित आहेत. अधिकारी गांभिर्याने काम करीत नसल्याचे दिसत आहे.

नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनामधे आ.संजयमामा शिंदे यांनी ९१७ मालमत्ताधारकांच्या प्रश्नी लक्षवेधी सूचना मांडली होती.या लक्षवेधीची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने दि.१७ जानेवारी रोजी कुर्डुवाडी येथील उपविभागीय कार्यालयात या ९१७ मालमत्ताधारकांची धारकांच्या प्रश्नी बैठक घेण्यात आली.या बैठकीत आ. बबनदादा शिंदे व आ.संजयमामा शिंदे बैठकीला उपस्थित होते.मात्र यावेळी प्रांताधिकारी व भूमीअभिलेख अधिकारी अनुपस्थिती होते. पहिल्या टप्प्यात ३९० मालमत्ता नियमानुकूल झाल्या आहेत.तसेच नागरिकांच्या पाठपुराव्यानंतर ९० मालमत्ता नियमानुकूल झाल्या मात्र त्यावर मालमत्ता प्रकार वर्ग ब हा कायम आहे. त्यानंतर उर्वरित २३७ मालमत्ता नियमानुकूल करण्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांना आ. शिंदे बंधूंनी सूचना देऊन १५ दिवसाच्या आत काम मार्गी लावा नाही तर पुन्हा मुंबईतील अधिवेशनात प्रश्न पुन्हा उपस्थित करणार आणि त्यातून या कामाबाबत चुकारपणा



करणाऱ्या अधिकाऱ्यावर भविष्यात होणाऱ्या कारवाईला जबाबदार असाल असा इशाराही या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना दिला होता. ४८० मालमत्ता नियमानुकूल झाल्या आहेत त्या 'ब' वर्गातून 'अ' वर्ग करण्यासाठी १ हजार स्क्वेअरफूट पर्यंत विनाशुल्क होणार होत्या व त्यापुढच्या मालमत्तांसाठी रेडी रेकनर ९५ प्रमाणे बाजारभावाच्या २५ टक्के रक्कम भरून त्या 'अ' वर्ग करता येतील असा शासनाच्या ८ मार्च २०१९ रोजी जी आर होता. परंतु जी आर ला तीन वर्षाची मुदत देण्यात आली होती. यानंतर ८ मार्च २०२२ रोजी जी आर ची मुदत संपली आहे. २५ टक्क्याऐवजी ७५ टक्के भरावी लागणार असल्याचे वर्ग ब चे मिळकतदार विजयसिंह परबत यांना जिल्हाधिकारी प्रशासनाकडून सांगण्यात आले. विजयसिंह परबत यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सदर नियमानुकूल झालेल्या 'ब' वर्गातील मिळकतीत 'अ' करण्यासाठी निवेदन दिले असता त्यांनी सदर (२५ टक्के भरणा करावयाच्या) जी आर ची मुदत संपली असल्याचे सांगून बाजारमुल्याच्या ७५ टक्के प्रमाणे रक्कम भरावी लागेल असे सांगितले.

याबाबत विजयसिंह परबत यांनी माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना जीआर महाराष्ट्र शासन अधिसूचना राजपत्र ८७ महसूल व वनविभाग ८ मार्च २०१९ ला मुदतवाढ मिळण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करावा यासाठी निवेदन दिले आहे. याबाबत भाजप जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, महादेव बागल आदी उपस्थित होते.

## व्यवसायासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

### पतीसह पाच जणांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

लग्नात आमचे योग्य ते मानपान केले नाही.असे म्हणून मानसिक व शारीरिक त्रास देऊन व्यवसायाकरिता माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये असा तगादा लावत नांदवण्यास नकार दिल्याप्रकरणी पीडित विवाहित महिलेने पतीसह पाच जणांच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची हकिकत अशी की, फिर्यादी स्नेहा विठोबा घटकांबळे (वय-२६,रा.सुशिल नगर, विजापूर रोड) यांचा ४ ऑगस्ट २१ रोजी विठोबा घटकांबळे यांच्याशी विवाह झाला होता. लग्नानंतर तुझ्या वडीलांनी लग्नात आमचा मान पान व्यवस्थित केला नाही.रुकवताचे सामान दिले नाही.असे म्हणून मानसिक व शारिरीक त्रास दिला.तसेच व्यवसायाकरीता ५ लाख रुपये घेवून येणेबाबत तगादा लावुन सासू महादेवी घटकांबळे, दिर अंबादास घटकांबळे- (रा. बाणेर, पुणे), नणंद रेणुका देवानंद गायकवाड व देवानंद गायकवाड, (दोघे रा.सुतारवाडी, पुणे) यांनी शारिरीक व मानसिक त्रास देत आम्ही विठोबा याचे दुसरे लग्न करू, असे म्हणत हाताने मारहाण करुन नांदविण्यास नकार दिला आहे.

अशा आशयाची फिर्याद विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली.याप्रकरणी स्नेहा घटकामुळे यांनी फिर्याद दाखल केली असून विजापूर नाका पोलीस ठाण्यात पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.





## गण गण गणात बोतेच्या जय घोषात हजारो भाविकांनी घेतले गजानन महाराजांचे दर्शन

### सोरेगावच्या मंदिरात भाविकांची गर्दी

**सोलापूर** : संत गजानन महाराज यांचा १४५ वा प्रकटदिन सोरेगाव येथील मंदिरामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाने हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. प्रकट दिनानिमित्त भाविकांनी श्रीच्या दर्शनासाठी पहाटेपासून मंदिरात गर्दी केली होती.

दरम्यान, मंदिरात गेल्या तीन दिवसापासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाखरे व कार्यवाह गुरुलिंग कन्नूरकर यांनी श्रीं.च्या मुर्तीस दुग्धपंच्यामृत महाअभिषेक व महारुद्र पुजा करण्यात आली. त्यानंतर श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहिक पारायण, महाराजांची बावन्नी,अष्टक, २१ दुर्वांकुरानी पारायणची सांगता, शोभा साठे यांच्या हस्ते झाली. दुपारी बारा वाजून पाच मिनिटांनी मंडळाचे अध्यक्ष, विश्वस्त व भक्तगणांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वालास गोकाक, विजयकुमार रघोजी, सुहास गुडपल्ली, तुकाराम जाधव नारायण जोशी तसेच महेश अक्कलकोट, पंजाब नॅशनल बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी वीरभद्र माळगे, अविनाश केतकर, तुकाराम सोनाळे, हेमंत परळिकर हेमंत वैद्य, मधुसूदन क्षिरसागर, मोहन भालवणकर, वर्षा भावार्थी, उज्वला खरात उपस्थित होते.

**सजावटीसाठी दोन टन फुलांचा वापर...**


मंदिरात सुमारे दोन टन फुलांचा वापर करून आकर्षक सजावट करण्यात आली होती. पांढरा, केसरी, पिवळी जरबेरा, ऑरकीड झेंडू , गुलाब आधी विविध फुलांचा वापर करून मोठ्या खुबीने सजावट करण्यात आली होती. त्यामुळे मंदिर व गाभाऱ्याला अधिक आकर्षकता प्राप्त झाली होती. त्याचबरोबर यंदाच्या वर्षी संस्कार भारतीचे कलाकार अनंत देशपांडे व विनायक बोड्डू यांनी सभागृहात आकर्षक रांगोळी साकारली होती.

## राज्यात अबकी बार दोसो पार : आ.भारतीय

**सुराज्य/पंढरपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता प्रचंड असून यापुढे महाविकास आघाडीचा एकही उमेदवार लोकसभेला निवडून येणार नाही तर विधानसभेला देखील शिंदे-फडणवीस यांच्या दोनशेपेक्षा अधिक जागा निवडून येणार असल्याचा दावा भाजपाच्या महाविजय २०२४ चे प्रदेश संयोजक श्रीकांत भारती यांनी पंढरीत केला.

भाजपाने आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली असून याचाच एकभाग म्हणून पक्षाच्या वतीने महाविजय २०२४ हे लक्ष ठेवले आहे. याचे संयोजक म्हणून श्रीकांत भारती यांची दोनच दिवसापूर्वी नाशिक येथील पक्षाच्या बैठकीमध्ये निवड करण्यात आली. सदर निवडीनंतर भारती यांनी सर्व प्रथम श्री विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना अबकी बार दोसो पार हा नारा दिला. राज्यातील जनता हुशार असून त्यांनी मागील अडीच वर्षाचे सरकार पाहिले आहे. त्या सरकारची व आमच्या सरकारची तुलना करता जनता आम्हाला दोनशेपेक्षा जास्त जागेवर विजयी करणार असा दावा श्रीकांत भारती यांनी केला. तसेच पंतप्रधान मोदी यांची आज देखील मोठी लोकप्रियता असून राज्यातील सर्व ४८ लोकसभेच्या जागा भाजपा व मित्र पक्ष जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. विधानसभा निवडणुका शिंदे व फडणवीस एकत्रित लढणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या कमळ चिन्हावर लढविण्याचा पक्षाचा आग्रह आहे. परंतु जिंकणे हा प्राधान्यक्रम असल्याने यामध्ये काही बदल करण्याचे संकेत देखील त्यांनी दिले. शिक्षक व पदवीधर मतदार संघात भाजपाचा पराभव झाला असला तरी अशा पराभवांनी आम्ही खचुन जाणारे नाहीत. या उलट मोठ्या जोमाने काम करून अधिकच्या जागा जिंकू असा विश्वास व्यक्त केला.

दरम्यान, ठाकरे यांच्या सामनामधून काही दिवसापूर्वी केंद्रीय यंत्रणेचा वापर पंतप्रधान मोदी साप, विंचू प्रमाणे करतात अशी टीका करण्यात आली होती. यावर श्रीकांत भारती यांनी सामान्यामध्ये एखाद्या पॉम्पलेट प्रमाणे छापून येते. अशा पॉम्पलेटवर मी प्रतिक्रिया देणार नाही या शब्दात टीका केली. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होत नसल्याबाबत ही वारंवार टीका केली जात असते. यावर भारती यांनी आमचे सात जणच तुम्हा सर्वांना भारी आहेत असा टोला लगावला.

# रिकव्हरी अन् काटामारीत सोलापूर राज्यात अव्वल

### ▪ सोलापूरच्या साखर कारखानदारांवर सदाभाऊंचा गंभीर आरोप

**सुराज्य/सोलापूर**

रब्बीच्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर खरीप क्षेत्र वाढल्याने सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने उभारले. सोलापूरचे कारखानदार खूप नशिबवान असून त्यांच्याविरूद्ध शेतकरी आंदोलन करीत नाही.पण, सर्वाधिक वजनात काटामारी आणि रिकव्हरी चोरी राज्यात कुठे होत असेल तर ती सोलापूर जिल्ह्यात होते, असा आरोप गंभीर माजी राज्यमंत्री रयतक्रांती शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी केला आहे.





उसाच्या एफआरपीसंदर्भात तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी सदाभाऊ खोत रविवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी दिपक भोसले उपस्थित होते. खोत पुढे म्हणाले, १९८० च्या दशकात शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना हक्कासाठी बोलायला व लढायला शिकवले.पण, शेतकऱ्यांना लुटणाऱ्या मुठभर लोकांना बळीराजाची प्रगती नको आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी 'भारत जोडो' यात्रा काढली. ती सर्वसामान्यांसाठी नव्हे तर स्वत:च्या पक्षासाठीच होती, असेही खोत यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पक्ष विसरून कारखानदारांकडून शेतकऱ्यांची लूट

माजी मंत्री सदाभाऊ खोत म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदार पक्ष विसरून 'चोर चोर मावस भाऊ अन् अर्धे अर्धे वाटून खाऊ' या भूमिकेतून शेतकऱ्यांना लूटत आहेत. येथील शेतकरी कारखानदारांना त्रास देत नाही आणि त्यांना लगेच पैसे पण लागत नाहीत. त्यामुळे सोलापूरचे कारखानदार नशिबवान आहेत. कोल्हापूर, सांगलीप्रमाणे सोलापूरचे कारखाने एफआरपी देत नाहीत. त्याविरूद्ध आंदोलन उभे करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पवार म्हणजे 'ओसाड गावचे पाटील'

शरद पवारांचे आत्मचरित्र असलेल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात उद्योगपती गौतम अदानींचे कौतुक करण्यात आले आहे. असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, पवारांच्या पुस्तकात शेतकऱ्यांचं कौतुक झालं नाही, परंतु अदानींचं करण्यात आले आहे. पवार हे ओसाड गावचे पाटील असून, त्यांच्या बोलण्याला फारसा अर्थ असत नाही.

### राऊत म्हणजे टाइम पास चॅनल

यावेळी पवारांवर टीका करण्याबरोबरच खोत यांनी खासदार संजय राऊत यांचाही खरपुस समाचार घेतला. संजय राऊत हे फुल्ल टाईम टाइमपास चॅनल असल्याचं ते म्हणाले.

### मंत्रिमंडळाचा विस्तार

राज्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार न होण्यामागे अजित पवार हेच कारण असल्याचे सांगत ,अजित पवार यांचाच मुहूर्त अजून ठरत नाही. शपथविधी कधी घ्यायचा? हे नक्की झालं की मंत्रिमंडळ विस्तार होईल असं सूचक विधान खोत यांनी केले आहे.